
# गोंदवलेकर महाराज प्रवचने



# ब्रह्मचैतन्य

शशिकांत कोंडेजकर

# ।।श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर प्रवचने।।

## शशिकांत कोंडेजकर

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# ।।श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर प्रवचने।।

## कवी : श्री. शशिकांत कोंडेजकर

पत्ता : ए ३०२, मेघदूत, कोथरूड, पुणे.

भ्रमणभाष:-९९६०२४१६१७

संपर्क – व्हॉट्सऍपक्र. 99602 41617

Email : sbkondejkar@yahoo.com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ईसाहित्यप्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २६ ऑगस्ट २०२३


©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## श्री शशिकांत भगवान कोंडेजकर (काव्यानुवादक)



२००७ साली भाभा अणुसंशोधन केन्द्र मुंबई येथून वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी पदावरून निवृत्त. अनेक विषयांवर लेखन केले आहे. ई साहित्य वर त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत व त्यांच्या लिंक्स या पुस्तकाच्या शेवटच्या पानांवर सापडतील. त्यांवर क्लिक केल्यावर ती पुस्तके उघडतील.



अर्पण पत्रिका –

ही शब्दफुले \

**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या चरणी**

समर्पित

# दोन शब्द

श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांची प्रवचने आपल्याला पूर्ण परिचित आहेत. दैनंदिन नित्य पठणासाठी भक्तमंडळांमध्ये महाराजांची ही प्रवचने प्रचलित आहेत. माझ्या परिचयातील खूप जण प्रवचनांचे रोज वाचन करतात. आमच्या व्हाट्स ॲप समूहावरही नियमीतपणे ही प्रवचने गतवर्षी आमचे स्नेही (श्री.जोशी) देत होते. ती वाचून मला ही छोट्या पद्यरूपात लिहावी अशी भावना झाली, म्हणून हा प्रयत्न माझ्याकडून झाला आहे. असे काही करावे असे मला वाटले आणि ते वर्षभर घडले. यात माझे काहीच नसून याचे श्रेय मी महाराज आणि श्री. सुव्रतस्वामी गुरुकृपेला अर्पितो. ही एक प्रवचन एक कडव्यांची मालिका आपणा सर्वांना आवडेल अशी आशा करतो.

**गों** धळलेल्या जगामध्ये एक शांत ब्रह्मचैतन्य ।

**द** र्शन सदाचार सद्बुध्दीचे हे असे अनन्य ।।

**व** र्तन व्यवहारासाठी हेच मार्गदर्शन ।

**ले** प श्रीरामभक्तीचा संसारतापास देउन ।।

**क** रतात श्री सद्गुरू ही कृपा देती समाधान ।

**र** क्षतील तेच आम्हा राखता त्यांचे मन ।।

**म** हिमा रामनाम स्मरणाचा किती अनंत ।

**हा** ररवीत नामस्मरण संकटे संसारात ।।

**रा** म राम सदा वाचे तसेच स्मरणात ।

**ज** न्म मृत्यू जरा व्याधी यांचा होईल अंत ।।



(जगाच्या कल्याणा संतांचे लेखन |

तयांचे वचने मिळेल खरे साधन ||

परमार्थासाठी त्याचे करावे श्रवण मनन |

देहाचा भोग देहा, आपुले भगवंती मन ||)

जिवा शिवा जोडी नाम ।
सगुण निर्गुणात नाम ।।
चित्त शांत करी नाम ।
अंती येवो मुखी नाम ।।
१ जानेवारी

नाम देती कृपाळू सद्गुरू ।
नामस्मरणे तेचि कल्पतरू ।।
अभिमान आपला दूर सारू ।
भगवंत हा प्राप्त करू ।।
२ जानेवारी




नाम श्र्वासोच्छ्वासी स्मरणी ।
नामाहून काय जीवनी ।।
जसा होई नामजप मनी ।
भगवंत करी कृपा झणी ।।
३ जानेवारी

अनायासचि करु स्मरण ।
नामाचे नको विस्मरण ।।
दे देवा तव सान्निध्य ।
हेच होय परमसाध्य ।।
४ जानेवारी



एक धरावी मनी आवडी |
एक नामाची यावी गोडी ||
चित्त तेथेचि ठेवोनिया |
हाक द्यावी त्या रामसखया ||
५ जानेवारी

रूप आधी नंतर नाम ।
स्थलकाला पर ते नाम ।।
सगुण निर्गुण अरूप नाम ।
स्मरू अविरत तेच नाम ।।
६ जानेवारी



प्रेमळांनी प्रेम द्यावे ।
ईश्वराचे नाम घ्यावे ।।
घेतलेले नाम हृदयात ।
उद्धवेल तोचि भगवंत ।।
७ जानेवारी

नाम घेता सदोदित |
प्रेम येईल चित्तात ||
ताक घुसळता नवनीत |
तसे प्रेम येई नामात ||
८ जानेवारी



नाम घेता उठता संशया |
गुरु किल्ली त्याच्या विलया ||
विकल्पाची जी सूक्ष्म माया |
नाम निरसेल तया लीलया ||
९ जानेवारी

प्रपंच प्रयत्ना नीट करावे |
चित्ती परमात्मा रामा ठेवावे ||
इह पर रामावीण नसावे |
शुध्द चित्ते भगवंता स्मरावे ||
१० जानेवारी

रामनामाची जपमाल |
खासचि राम भेटवेल ||
रामनामे संसारमूल |
झणी लया तो नेईल ||
११ जानेवारी

प्रपंच कसा तो कळावा !
भगवंत कसा मेळवावा !!
नामानेच  करावा धावा !
नाम सद्वस्तूस मिळवा !!
१२ जानेवारी

नाम उच्चार तो भगवंत |
तेच कर्म सफळ होत ||
नामाविना ना जीवित |
नामप्रेमे उभा भगवंत ||
१३ जानेवारी

नाम हीच किल्ली खास ।
सत्कर्मे होती विनासायास ।।
निश्चये घ्यावा नामध्यास ।
तेव्हाच पावे समाधानास ।।
१४ जानेवारी

उत्तम विचार संगत |
सदा रंगणे नामात ||
नाम, संत, भगवंत |
करती संकटे समाप्त ||
१५ जानेवारी

अपेक्षाविनाच नाम घ्यावे |
मनी आनंदा मिळवावे ||
शुद्ध आचारे नामा धरावे |
गुरु ध्यानात ठेवावे ||
१६ जानेवारी

ऐका बोला नाम केवळ ।
तेच सर्व भक्तींचे मूळ ॥
दाने तीर्थी करा प्रक्षाळ ।
तरी रामस्मरणाची निर्मळ ॥
१७ जानेवारी

गुरुमुखे नाम मिळता ।
नको शंका नको चिंता ॥
भगवंताचे नाम घेता ।
तेथे पुरुषोत्तम त्याची सत्ता ॥
१८ जानेवारी

उपाधी नाही भगवंतास |
त्याशी नाते जोडावयास ||
स्वदेह विसरून घ्या नामास |
विलय होईल भोगास ||
१९ जानेवारी

वेद शास्त्र स्मृतीचे हे सार |
नाम घ्या मना करुनि स्थिर ||
रामावरी टाकावा सर्व भार |
कल्याण करी तोचि खरोखर ||
२० जानेवारी



वाचे अखंड नाम घ्यावे ।
स्वदेह विसरूनी देवा पाहावे ॥
अविरत नाम भजावे ।
नाम तेच अनुभव जाणावे ॥
२१ जानेवारी

याच क्षणी प्रारंभावे ।
निरपेक्षे नाम घ्यावे ॥
भवसागरी नाम नाव ।
भगवंताचा मिळेल ठाव ॥
२२ जानेवारी

आधी ते सदाचरण ।
ठेउनि शुध्द अंतःकरण ॥
निष्काम करावे नामस्मरण ।
देई भगवत् कृपेची पखरण ॥
२३ जानेवारी

मना ठेवा भगवंतचरणी ।
देहभोग प्रारब्धाची करणी ॥
अखंड रहा नामस्मरणी ।
शुध्द मने नीती आणा आचरणी ॥
२४ जानेवारी



दिव्याला स्नेह तरूला पाणी |
तैसे अनुसंधान स्मरणी ||
भगवंत ठेवील समाधानी |
स्मरता नेहमी त्यास मनी ||
२५ जानेवारी

प्राणासम सहज नाम |
त्याच्या सहवासे वाढेल प्रेम ||
योग कर्माहून भक्ती परम |
अंती स्मरता मिळेल ते धाम ||
२६ जानेवारी

सगुण चमत्कार गौण |
मुख्य साधन नामस्मरण ||
होईल देहाचे विस्मरण |
करिता नामाचे पारायण ||
२७ जानेवारी

कर्म करा मीपणा त्यागून |
रामे केले मानता अनुसंधान ||
भूत भविष्याची चिंता सोडून |
विश्राम नामी ठेवता मन ||
२८ जानेवारी

सर्वत्रांत पहावा भगवंत |
कोणीच न दिसेल शत्रुवत ||
निर्धास्त रहावे नामात |
ईश करील आपले हित ||
२९ जानेवारी

जयांना इच्छा महाराजांसाठी |
नामाचे पुण्य बांधावे गाठी ||
जरी अज्ञानी वेद स्मृती शास्त्रासाठी |
दासबोध आणि नाम असावे ओठी ||
३० जानेवारी



पूर्वी ईश्वर अवतरले |
दुष्ट दुर्जना निर्दाळले ||
या युगे "नाम" रूपेच आले |
प्रेम नामीच पाहिजे लावले ||
३१ जानेवारी

जागे व्हा जाणा तुम्ही त्याचे |
सर्वदा स्मरा नाम वाचे ||
तेव्हा साधेल तद्रूप त्याचे |
शिव होऊनी पूजन करा शिवाचे ||
१ फेब्रुवारी

सुख शोधता ऐहिकात |
दुःखाचे मूळ या कल्पनेत ||
सद्बुद्धी उपजते नामात |
नामची असे प्राण उपासनेत ||
२ फेब्रुवारी

ओळखावे आपले अवगुण |
टाळावे दुसऱ्यांचे परीक्षण ||
आपुलेच होते  दर्शन |
करिता नाम साधन ||
३ फेब्रुवारी

संत सज्जनांची संगती |
सोपी करेल शरणागती ||
नामे भगवंती करावे वृत्ती |
वासनाक्षये भेटेल सद्गती ||
४ फेब्रुवारी

सुस्थितीत वा संकटात |
होई स्मरण सहजची सतत ||
दृढपणे घ्यावे सर्व काळात |
श्रद्धेने रहावे नामस्मरणात ||
५ फेब्रुवारी

हरिचिंतन करा एकांती |
त्यागुनी मीपणा आसक्ती ||
नामे आपणची साधती |
भगवंतपदी शरणागती ||
६ फेब्रुवारी

स्थावर-जंगमादि गोष्टी |
न देता करिती कष्टी ||
वाचा ऐका संतांच्या गोष्टी |
ठेवा सदा भगवंती दृष्टी ||
७ फेब्रुवारी

प्रपंच सहवास आभास |
अंतरी भगवंताचा वास ||
नामाने विषयाचा निरास |
विश्वासावे सद्गुरु वचनास ||
८ फेब्रुवारी

पैसा काम लोकेषणा |
मर्यादेत ठेवणे शहाणपणा ||
नित्य रहावे गुरुचरणा |
अवलंबणे वाचन मनन आचरणा ||
९ फेब्रुवारी



जरी क्षीणता इंद्रियासी |
तरी ती नाही रामापासी ||
प्रपंची नच ठेवावी उदासी |
परी चित्त ठेवावे नामासी ||
१० फेब्रुवारी

जशी छाया अभिन्न आपुली ।
तशी ईश्वराची माया सावली ।।
तिजपासूनच्या मुक्तीची वल्ली ।
भगवंत नामाची गुरुकिल्ली ।।
११ फेब्रुवारी

चराचरात असते जे अस्तित्व ।
तेच नाम आणि ॐ कार तत्त्व ।।
नामापासून वस्तुमात्रा अनेकत्व ।
नामचि अनादि अनंत ईश्वरत्व ।।
१२ फेब्रुवारी

ॐकार नामे वेदांची उक्ती ।
नामचि सोडवी आसक्ती ।।
नाम घ्यावे  यथाशक्ती ।
नामानेच भगवंत भक्ती  ।।
१३ फेब्रुवारी

नामे जातील गुणदोष ।
नामानेच मिळेल संतोष ।।
भगवंत भक्तीचा परिपोष ।
सर्वदा देईल संतोष ।।
१४ फेब्रुवारी

ज्ञान मार्ग असे कठीण ।
कदाचित वाढवेल अभिमान ।।
कर्ममार्गे पहा कर्मठपण ।
नामे करावे ईशस्तवन ।।
१५ फेब्रुवारी

मना नामसंगती धरावी |
सर्व वासना विसरावी ||
गुरू खरी वाट दावी |
गुरुवचनी चाल ठेवावी ||
१६ फेब्रुवारी

साधू संगती देई सुबुद्धी।
नामाने विसरावी देहबुध्दी ।।
संतपदी मिळेल सुबुद्धी ।
भाव ठेवता साधन सिद्धी ।।
१७ फेब्रुवारी

उत्पत्ती स्थिती लय ज्याचा अर्थ |
तो ईश्वर सदा निस्वार्थ ||
तेथे भाव ठेवा सोडून स्वार्थ |
नाम सत्य विषय सर्व ते व्यर्थ ||
१८ फेब्रुवारी

संतांनी पाहिला देव |
त्यास भेटण्याची नाव ||
नामाने त्यास म्हणावे पाव |
नामेच पार होईल भवार्णव ||
१९ फेब्रुवारी

जरी देह इंद्रिये कर्मी रत |
मनी ध्यानी राखावा भगवंत ||
नाम माझा बंधु माता तात |
सर्व त्याचेच तोचि चित्तात ||
२० फेब्रुवारी

मी कर्ता नव्हे खरा कर्ता तोच |
विषया त्यागूनचि भक्ति होय साच ||
देवासाठीच वेळ करावा खर्च |
कर्म देवाला होई अर्पण आपोआपच ||
२१ फेब्रुवारी



धन बुद्धी हून श्रेष्ठ सदाचरण |
भगवंत निष्ठा देईल समाधान ||
सदा करावे नाम साधन |
शुद्ध त्याने होईल अंतःकरण ||
२२ फेब्रुवारी

त्याची इच्छा तो करील हित |
रामाचा होऊनी रहा स्मरणात ||
निंदा स्तुती यांची काय मात |
विषयातही रहा सदा नामात ||
२३ फेब्रुवारी

देहभावात सगुण भक्ती |
त्यातून होई स्वविस्मृती ||
उद्धवेल भगवंताची प्रीती |
सर्व पावेल परमात्म्याप्रती ||
२४ फेब्रुवारी

आपल्यासारखे जना वागवावे ।
भगवंताला प्रिय व्हावे ।।
नामात स्वतःला विसरावे ।
अवगुण आपले ओळखावे ।।
२५ फेब्रुवारी

झाले शरीर कितीही दुर्बल ।
नाम घ्यावे येता अंतकाल ।।
धन वैभवही नसे सर्वकाल ।
या विनाही नामाने जीवन सफल ।।
२६ फेब्रुवारी

आहे रामरगाडा प्रपंचाचा |
म्हणून नाम न ये वाचा ||
पण जरी ध्यास भगवंताचा |
मिळेल ठेवा नाम अमृताचा ||
२७ फेब्रुवारी



भगवंतप्रेमी गुरुंचा निर्देश |
तेथेच ठेवावा विश्वास ||
प्रारब्ध आणि मीपणाचा नाश |
होईल ठेवल्या अनुसंधानास ||
२८ फेब्रुवारी

पालटे देह प्रपंच दृश्य ।
म्हणून लोभ सोडावा अवश्य ।।
अंतरी राम तोच देई श्र्वास ।
धरावा आमरण नामाचा ध्यास ।।
२९ फेब्रुवारी

वृथा संसारी पुन्हापुन्हा वास |
विषय मिथ्या न कळे कोणास ||
संसारी सुख हाच आभास |
आकळकताचि  परमार्थाचा ध्यास ||
१ मार्च

द्वेष मत्सरादि नको अवगुण ।
धरा सुसंगती ग्रंथवाचन ॥
नियम तो पाळावा मनोमन ।
देवभक्तिचे एक नाम साधन ॥
२ मार्च

प्रपंच आवश्यक जरी |
विसरू नये भगवंता तरी ||
कर्तव्यी राहावे संसारी |
रामास स्मरावे परोपरी ||
३ मार्च

समर समयी धीर धरावा ।
नामात भरोसा राखावा ।।
पवित्र बंधनी मान ठेवावा ।
विकारा नियमुनी गुण वाढवावा ।।
४ मार्च

अहंपणा नसता येई भगवंत ।
त्यापुढे कर्तेपणाची काय मात ।।
कर्मफळी रहावे समाधानात ।
सर्व समर्पण होई नामात ।।
५ मार्च

मी पणा अहं हे वासनेचे मूळ ।
नाम एक त्यासी करील निर्मूल ।।
मी नव्हे तोचि कर्ता जो जाणेल ।
एकचि दाता त्याचे स्मरण होईल ।।
६ मार्च

पुत्र कलत्राचे सौख्य खरे का ते |
त्याचे कष्ट पहा दुखःचि देते ||
नियम वळण ज्या घरी सदा असते |
तेथेचि सुखही राहावयास येते ||
७ मार्च

सर्व सुखे जरी घरी आली ।
प्रपंचीची कधी काळजी का मिटली ।।
हाव संपली  स्थिती कधी आली ।
आत्मप्रचीतीनेच साधना वाढली ।।
८ मार्च

स्वार्थ व्यवहार वा हिताहित ।
निवडून वर्तती प्रपंचात ॥
तरी रहावे व्यवहारी मित ।
त्या मध्यमांची चांगली संगत ॥
९ मार्च

गणगोत अतिथी आतिथ्य ।
पतीसेवेसह रामनाम पथ्य ॥
मनी शांती समाधान तथ्य ।
रामचि सत्य बाकी असे मिथ्य ॥
१० मार्च

सर्व कर्मांचे  हरिस्मरणे क्षालन ।
ईशकृपेला आड अभिमान ।।
नामाने दर्प विषयाचे निरसन ।
भवतरणा नामचि साधन  ।।
११ मार्च

विषयाचे विष आनंदाचे मिष ||
असता न मिळे सत्कर्मीही संतोष ||
कर्म करावे न धरावी फळाची आस |
तरीच पावतील समाधानास ||
१२ मार्च



निष्ठेने भजा ते ईशचरण |
तोचि करील आपले पालन ||
निष्ठेआड असे अभिमान |
ते नाम देईल शांति समाधान ||
१३ मार्च

संसारी निस्वार्थ प्रेम करा |
तसेच प्रेम द्या ईश्वरा ||
आपलेपणा जसा परिवारा |
भगवंताप्रति तेच नाम धरा ||
१४ मार्च



जे करील मायेतून मुक्तता |
सत्य हे ज्ञान तत्त्वता ||
ॐ कार अंतीम नव्हे नव्हे म्हणता |
तेच नाम संता शरणागता ||
१५ मार्च

प्रपंची सुखाशेने असे आसक्ती |
शास्त्रधर्मसदाचारे होईल निवृत्ती ||
द्वेषमत्सरातून दूर ठेवा वृती |
जिव्हेने भगवंतनाम देईल मुक्ती ||
१६ मार्च

असो असल्याचा आनंद |
नसले तरी तोच मोद ||
कर्मफळ ईश्वरे निर्विवाद |
नामस्मरणात त्याचा प्रसाद ||
१७ मार्च

इच्छापूर्तीच्या मृगजळे  तृप्ती होय कोणा |
प्रपंच नव्हे माझा रामाचाच होय जाणा ||
शरणागत या पदी होऊनी करा तसे आचरणा |
श्रीराम जय राम जय जय राम सदा मुखे म्हणा ||
१८ मार्च

प्रेम देता करता काय खर्च होतो |
समविचारी माणसांचा सहजयोग होतो ||
परिसर भवताल आपलेपणाने भरावा |
पहाणे बोलण्यात प्रेमभाव धरावा ||
१९ मार्च

मी पणा अभिमान दुःखाचे कारण ।
देहेबुध्दी स्वार्थे अहित रामावीण ।।
भोगाने न होते वासना क्षीण ।
रामशरण होता होई दुःख निवारण ।।
२० मार्च



नाही भगवंतप्रेमाची आच ।
सुखभोगे ना समाधान साच ।।
परमार्थ समजून करता प्रपंच ।
पूजाअर्चने नामध्यास होई हाच ।।
२१ मार्च

भक्ताचे अंतरी देवाचा देव्हारा |
त्यास आपलासा करा ||
आसक्ती वासना दूर सारा |
मनी सर्वदा राम धरा ||
२२ मार्च


प्रपंची राहण्या समाधान |
हवे भगवंताचे अधिष्ठान ||
राखा संतसंग सद्विचार धन |
आणि करा अखंड नामस्मरण ||
२३ मार्च

ध्यास आनंदाचा, शोध वस्तूत त्याचा |
परी त्या न देती सुख, चूक मार्ग ध्येयाचा ||
आस सोडता आनंद, उपदेश भगवंताचा |
दास त्याचे व्हा, धरा मार्ग नामस्मरणाचा ||
२४ मार्च



संसारी सोबती नाही सर्वकाळ सोबत |
त्यांचे संगती प्रपंची नाही सुख भेटत ||
खरे समाधान जेथे संगे भगवंत |
स्वदेह लोभ जाईल ईशप्रेमे नामात ||
२५मार्च

इंद्रिय सुख विषय ताटातूट निश्चित |
धनधान्यादि वस्तूत ते नाही निश्चित ||
ईश्वरे ठेविले माना समाधान त्यात |
अविनाश अनंत ती वस्तु भगवंत ||
२६मार्च



सन्मार्गे सदाचारेही का दुःख येई |
विषय अनुसरता भगवंत ते देई ||
वास भगवंती ठेवता वासना जाई |
मन तयाचरणी ठेवता अपेक्षा जाई ||
२७ मार्च

स्वतःसाठी केले ईश्वर अनुसंधान |
तरी प्रपंचात ठेवा कर्तव्याचे भान ||
उणिवा आपल्या शोधून करा उन्नयन |
सर्व कर्मे करा भगवंता स्मरून ||
२८ मार्च

अन्न प्राण मन विज्ञान आनंदा |
पिंडी ब्रह्मांडी अस्तित्व सर्वदा ||
साक्षीत्वे राहती व्यापातून सदा |
नामस्मरणे ते पावती ब्रम्हानंदा ||
२९ मार्च

सकल धर्माची धुरा गृहस्थाश्रम खास खरा |
शांतीपूर्ण हितकारक प्रपंची राखा व्यवहारा ||
आप्तेष्ट सज्जन कुटुंबा प्रेम आदर समाधान धरा |
राहून निर्व्यसनी निस्वार्थी सदा नामस्मरण करा ||
३० मार्च



खरे कर्तृत्व ज्याचे त्या एक देवे |
त्यास ते देऊन सुखदुःखातीत रहावे ||
स्वस्थानीच विवेके आनंदास मिळवावे |
भगवंतकृपेने स्वतःलाच सुधारावे ||
३१ मार्च

अंगी येती संगतीचे संग गुण |
सत्पुरुषामुळे लाभतील उत्तम गुण ||
संतांच्या संगाचे नसे सदा सुलभपण |
म्हणून सर्व काळ उत्तम नामस्मरण ||
१ एप्रिल

सत्संगतीचा महिमा अपार |
तेथ नसे वासनेचा बडिवार ||
नवविधा भक्तीचा महापूर |
संताच्या संगे लाभे खरोखर ||
२ एप्रिल

सर्वत्र जे पाहती भगवंत |
तेच जाणावे साधुसंत ||
देवाची करुणा करी शुध्द चित्त |
समभाव मार्दव भेटवी भगवंत ||
३ एप्रिल

संत जाणती शिष्याची पायरी |
जो पूर्णतया शरणागती पत्करी ||
संत ते जगाचे दुरित दूर करी |
तयांचा बोध पाळावा थोडातरी ||
४ एप्रिल

संतसंगती पाप शोषुनी |
निर्विषय मना करी झणी ||
मृदु मधुर संतांची वाणी |
संग त्यांचा लावी भजनपूजनी ||
५ एप्रिल

मनुष्यजन्म हेच भाग्य थोर |
येथेच मिळवा तो ईश्वर ||
त्यास्तव संतसंग मार्ग खरोखर |
तेच करिती भवभय दूर ||
६ एप्रिल

वृथा होईल श्रवण वाचन |
न केल्या आचरण मनन ||
उन्नतीस्तव स्वातंत्र्य प्रपंची बंधन |
कर्तव्य आणि नामात समाधान ||
७ एप्रिल

अवलंबिता कर्म उपासना ज्ञान ।
त्याहून नाम हेच एक साधन ॥
श्रद्धा संतांशी निःशंकपणे ठेवून ।
एक तत्त्व नाम धरा मनोमन ॥
८ एप्रिल

संतांनी परमात्मा आणिला सगुणात ।
नामस्मरणे तो होतसे आत्मसात ॥
सद्ग्रंथ निर्मिले जसे ज्ञानेश्वरी भागवत ।
कथिले अन्नदान हेच साधन कलियुगात ॥
९ एप्रिल

संत कृपेने होई रामचरण प्राप्त |
तोच आपला स्वकीय आप्त ||
त्याचा वास आपणाला इच्छित |
मी- माझे त्यागून तया सर्व अर्पित ||
१०एप्रिल

निर्मत्सर निर्द्वेष समाधान |
नामस्मरण ऐक्यभाव निराभिमान ||
पूजणे सदा संत सद्गुरू सज्जन |
परमार्थ हाच हीच श्रुति सनातन ||
११ एप्रिल

कामधेनू सर्वदा इच्छा पुरवी |
सद्गुरू वासना इच्छा नुरवी ||
भोवऱ्यातून  संत आपणा सोडवी |
संतसंगती परमात्मा भेटवी ||
१२ एप्रिल

शोधावे आपले कार्य संतग्रंथ वाचने |
ते न पहावे केवळ तर्कबुध्दीने ||
मर्म पहावे त्यात शुध्द मनाने |
अर्थ त्यांचा कळेल संतकृपेने ||
१३ एप्रिल

जगाचे कल्याण हाच संतांचा यत्न |
तयांची संगती आणि ग्रंथ वाचन ||
तयांच्या कृपेनेच ग्रंथ आकलन |
साधन  मनन संतांचेआज्ञापालन ||
१४ एप्रिल

अर्थप्राप्ती धनप्राप्ती यात नच गुंतती |
निरिच्छ लोभहीन असे सर्वदा राहती ||
परद्रव्याची तयांना नसते कधी मती |
सद्भावना सद्विचार तयां देते सत्संगती ||
१५ एप्रिल



संतांच्या संगती भगवंताची प्राप्ती |
नको मान ना वाचाळता  वेदांती ||
संतांची आज्ञा जे सर्वदा मानती |
प्रगती तयांची मिळेल तशी प्रचीती  ||
१६एप्रिल

अखंड अनुसंधान राखा भगवंताचे |
संतकृपा सोडवी भ्रम विषयाचे ||
भाव मनी जागवा समर्पणाचे |
तयाचे नामस्मरणे प्राप्त फळ कृपेचे ||
१७एप्रिल




सामान्या जेथ विषयाची आवड ।
भक्ताला सदा परमात्म्याची आवड ।।
आपणा षोडशोपचाराची आवड ।
संत नामी दंग तयां रामाची आवड ।।
१८एप्रिल

संत दाविती तुमचा भवरोग |
उपायही तेचि देती संतसंग ||
सदा राहावे नामातचि दंग |
अनन्यत्वे साधन हे करा अवगत ||
१९ एप्रिल

प्रारब्ध प्रपंचाचा असू नये त्रास |
संकल्प त्यागता मनी शांति संतोष ||
संतदर्शन रामनाम यांचा घ्यावा ध्यास |
देह जरी प्रंपची तरी नाम श्वास ||
२० एप्रिल

सर्वांच्या अंतरी पाहू भगवंतभावा |
संतांचा आम्हा विसर न व्हावा ||
जसे हवे तसे तुम्ही आम्हा ठेवा |
नाम त्याचे घेता संत भेटविती देवा ||
२१ एप्रिल



संत सहवास मंत्र नि विचार |
देती समाधान हेचि उपकार ||
संतसमागमी वासना परिहार |
देहापार सुख संत देती ते ईश्वर ||
२२ एप्रिल

जगाच्या कल्याणा संतांचे लेखन |
तयांचे वाचने मिळेल खरे साधन ||
परमार्थासाठी त्याचे करावे मनन |
देहाचा भोग देहा, आपुले भगवंती मन ||
२३ एप्रिल

पूर्व संचिताने इच्छा मोक्षाची होये |
संतांच्या कृपेने भगवंताचे व्हावे ||
मनाच्या आहारी आपण न जावे |
कर्मरतीही सदा नाम मनी घ्यावे ||
२४ एप्रिल

विषय त्यागून हृदयी देव धरा |
वागणे बोलणे एक समान करा ||
संताची ती नीती म्हणूनी ते आधारा |
संतां संगे राही तोही संत खरा ||
२५ एप्रिल

संत कृपेने दिसे भगवंत मूर्तीत |
उपासनेने तेज उजळते तिच्यात ||
त्याचेचि दास्यत्व सर्वश्रेष्ठ जगात |
सुखाचा दाता तोचि जाणा भगवंत ||
२६ एप्रिल

निस्वार्थ होऊन साधा हित आपले |
नको लोभ स्त्री, धन जे नाही  आपले ||
परनिंदा सोडा संभाळा जनक जाया मुले |
संसारचि परमार्थ करुन साधा हित आपले ||
२७ एप्रिल

जाणे चुकली वाट त्या लागे तळमळ |
राम आणि संसार याचा कसा मेळ ||
अनुभवी साधु संत दावतात खेळ |
जगाच्या कल्याणा संतांचे हो बोल ||
२८ एप्रिल

परमार्थाआड येई धन संपत्ती |
संतसमागमे याची जाईल आसक्ती ||
देहबुध्दी सोडून करा रामभक्ती |
'स्व' ला समर्पिता मिळे खरी मुक्ती ||
२९ एप्रिल

धरुनी अभिमान स्वार्थ विषयी आस |
दूर ठेविती ते परमात्म वस्तु खास ||
शरण सदा राम आणि संत पदास |
अन्नदान मुखी नाम भेटवी आनंदास ||
३० एप्रिल

भावाविण नका करू उपास तापास |
नामस्मरणे येई सत्त्वगुण उदयास ||
हेतू भावतो देवाच्या मनास |
कृपेसाठी त्याच्या घ्यावा नामाचा ध्यास ||
१ मे

परमार्थी सावधानता सतत |
दक्ष सदैव राहणे प्रपंचात ||
नको पालटणे आपल्या वृत्तीत |
मीपणा त्यगून पहा भगवंत ||
२ मे


ओळखून धन कीर्तीची व्याप्ती |
मन लावावे भगवंता प्रती ||
सत्संग आणि त्याची स्मरण भक्ती |
देईल आनंद समाधान चित्ती ||
3 मे

संतांसम सदा नाम साधनेत असा |
तेच करिती पहा तुम्हा आपलासा ||
मन लाविते विषयाची लालसा |
त्यासाठी घ्यावा नामाचा वसा ||
४ मे

परमार्थाआड अदृष्य अभिमान |
सद्गुरू शरण प्रार्थना सोडील बंधन ||
ईश्वरासाठीच त्याची भक्ती करून |
त्यागाव्या सर्व इच्छा ईश्वरावाचून ||
५ मे

काया वाचा मनाचा सोडावा स्वार्थ |
जगासाठी झटावे हा खरा निस्वार्थ ||
वर्तणे जनासी आपणासम हाचि अर्थ |
भले चिंतणे करणे जना हा परमार्थ ||
६ मे

मी माझे पण वाढवी गर्व अभिमान |
ईश्वरा अर्पावे सर्व सुटण्या त्यातून ||
ऐकावे संतांचे ज्यांचे भगवंती मन |
पूजा नाम अन्नदान हेचि अनुसंधान ||
७ मे




जरा व्याधीतही राखा भगवंताचे स्मरण |
मन लालचता करा त्याची आठवण ||
म्हणा "माझ्याआड माझेचि अज्ञान |
जाणून 'मी तूच' राहो तुझ्या चरणी मन" ||
८ मे

नाशच आहे गुंतता द्वेष अथवा प्रेमात |
भगवंता विसरू नका दुखाःत वा सुखात ||
त्याचे स्मरण राहील संतांच्या  संगतीत |
ज्ञानाहुनी थोरवी असे नाम आणि भक्तीत ||
९ मे



काया वाचा मनी पूजावे रामास |
राम करी सर्व आपण निमित्तास ||
सद्गुरू सांगती राम नामची खास |
निस्वार्थ सेवा धर्म हा समाधानास ||
१० मे

व्यर्थ केवळ वाचन ज्ञानाचाच हव्यास |
सार्थकता तेव्हाच ते आणता आचरणास ||
निस्वार्थ निरपेक्षता देई समाधानास |
भौतिक वस्तूत सुख नाही फक्त भास ||
११ मे



काम क्रोध दंभ द्वेषाचे स्वार्थ मूळ |
नामस्मरण या घालवील समूळ ||
अभिमान कुविचारे मन होई गढूळ |
मधुर सत्य वाचे नाम  तारी केवळ ||
१२मे

उद्याची चिंता आणि कर्माची आठवण |
देह मनाच्या अस्थिरतेचे कारण ||
राम इच्छा मानणे हेचि अनुसंधान |
प्रयत्ने नामस्मरणे त्यासी जावे शरण ||
१३मे

संसारा प्रती ठेवता विरक्ती |
उद्भवेल भगवंताची आसक्ती ||
आशेने करता कर्म न लाभे मुक्ती |
संत समागमे येई रामाची भक्ती ||
१४ मे


मन आहे पहा ईश्वराची विभूती |
कुणा दुखावून देऊ नये क्षती ||
द्वेष बुध्दीस द्यावी मूठमाती |
सारासार ठेवून वाढवा प्रेमात रती ||
१५मे

देह इंद्रिये यासचि स्वतः हे म्हणतील |
या अभिमाने ते देहापुरतेच होतील ||
नामे या अज्ञान मायेतून जे सुटतील |
परमात्मपदी तेचि आरूढतील ||
१६ मे

हवे ते न मिळता दुःखात बुडती |
कर्ता करविता तोचि मानता तरती ||
झोपता उठता जेवता नाम घेती |
सदा ध्यास घेता त्या वस्तूस मिळती ||
१७ मे

मनाची वृत्ती सदाचि चंचळ |
शास्त्र नियमने ती करावी निश्चळ ||
भगवंताजवळी मना न्यावे सर्वकाळ |
त्याचेच स्मरणात समाधान सुख सकळ ||
१८ मे

द्वेष सोडून  प्रेम भरे जोडा जग |
भगवंताचे प्रेम लाभे त्याचे भाग्य ||
त्याचे ठेवा प्रेम अनुसंधान सत्संग |
नीती धर्मे नामे करा स्वतःला सुभग ||
१९ मे



स्वधर्म रामरायाची विस्मृती |
त्याचे मागे काळजी भीती ||
व्यर्थ सर्व ऐश्वर्य संपत्ती संतती |
दुःख साराया ठेवा मन रामाप्रती ||
२० मे

सर्वत्र भगवंताची सत्ता जाणणे |
तळमळीने नामस्मरण करणे ||
भगवंत आहे आनंद रूपगुणे |
वासना सोडूनि तया प्रेमाने पूजणे ||
२१ मे

दुःख भोग पेलण्या शक्ती |
तया मागावी करून भक्ती ||
सद्गुरु म्हणे भगवंत सर्वांप्रती |
तेच आपणा परिवर्तिती ||
२२ मे

देहभान विसरूनि करावे भजन |
एक देव आणि मी असे करावे मनन ||
विषय त्यागता गुरू देई साधन |
त्यांचे समागमे लाभेल समाधान ||
२३मे

देवाच्या द्वारी जावे जिव्हेने नाम घ्यावे |
देहासारिखे तरी प्रेम नामाला द्यावे ||
स्वयंभू नाम विकल्पीही न त्यागावे |
वासनाही जाईल नामे नामातचि राहावे ||
२४मे

तृष्णा वासना त्यागुनी कर्म करिता संन्यास |
चिदानंद मिळेल त्यागुनी स्व अभिमानास ||
विषयी शोधता आनंद तो एक असे भास |
देहबुध्दीस त्यागता प्राप्त पहा तुम्ही आनंदास ||
२५ मे

भावना ठेवता भेटे विश्वरूप ईश्वर क्षणोक्षण |
ब्रह्मचैतन्य म्हणती 'मजवरी उपकार नामस्मरण' ||
सद्बुध्दी दुर्बुध्दीला त्याचे स्मरण विस्मरण कारण |
त्याचे अनुसंधाने मिळे पुण्य सदा दिवाळसण ||
२६ मे

जगाच्या कल्याणा महात्मे जन्मती |
संधी पर उपकारा ईश कृपाच जगती ||
त्यात अभिमान येऊ नच देती |
त्यासाटी राहता नामात, मिळे चित्तशांति ||
२७ मे

सुखे भोगावे आले देहकष्ट |
काळजी वाहती गुरू सर्वश्रेष्ठ ||
न मागा देवा काहीही विशिष्ट |
प्रार्थने तो देई ज्ञान,मार्ग आणि इष्ट ||
२८ मे

व्यवहारी खोटा आणि स्नानसंध्या त्रिकाळ |
वरी विषयी आनंद त्याचे समर्पण निष्फळ ||
सर्व भोग संकटे आपुल्या कर्माचेच फळ |
भगवंत सर्वसाक्षी त्याचीच धरा तळमळ ||

२९ मे

अकर्तेपणे गुण वाढवावे दोष करावे दूर |
निरभिमान निर्भयपणे ठेवा प्रारब्ध रामावर ||
इंद्रिये जरी क्षीण विषयी वृत्ती राहिली तर |
संतपदी न ठेवता वृत्ती रघुपती राहील दूर ||
३०मे

देहभान विसरुनी करावे भगवंताचे स्मरण ।
अभिमान त्यागुनी पाळावी गुरुआज्ञा प्रमाण ।।
नीती आणि सत्संग करावा टाकुनिया कर्तेपण ।
नाम घ्यावे प्रेमादराने जावे भगवंता शरण ।।
३१ मे

सत्य ज्ञान देह आभास जाणे तोचि मुक्त ।
जया नाही सुख वा दुःख तो जाणावा मुक्त ॥
फलाशेविना कर्म त्याचे स्मरण परमार्थी युक्त ।
त्याच्या  अनुसंधाने जन्मसार्थक करी भक्त ॥
१ जून

सद्यस्थितीत समाधान हे परमार्थ शास्त्र ।
निस्वार्थ राहुनी व्यवहारी दक्ष हे याचे सूत्र ||
भगवंत पहावा सर्वांमध्ये आणि सर्वत्र |
सद्गुणांची वाढ होई करिता साधना मात्र ||
२जून

मी माझे स्व असता कसे देवाला शरण ?
दारा पुत्र यांसाठी घेता नाही खरे नामस्मरण ||
परमार्थ नव्हे व्यर्थ कष्ट आणि ते पारायण |
चित्ती स्थिर मनी शांत सावधान हे मोठेपण ||
३जून

परमार्थ साधण्याला करा त्याग वासनेचा |
अभिमान सोडता गुरू दाखवी मार्ग परमार्थाचा ||
रामचि सर्व करितो जाणुनी संसार करावा साचा |
समाधानी स्थिर वृत्तीस मार्ग एक अनुसंधानाचा ||
४ जून

विषयापासून राखा मनी अखंड सावधानता |
शुध्द चित्ते अनुसंधान करा परमार्थाकरिता ||
संपत्ती पुत्र जाया यांच्याप्रती विरक्तता |
विजनी करा नामस्मरण ठेउनी निःशंकता ||
५ जून

आपण हाच आत्मा तोच परमात्मा ओळखून |
सच्चिदानंद ठायी स्थिर मन हे अनुसंधान ||
दोषमुक्तता मिळे ज्ञानयुक्त कर्मे करून |
भगवंती एकरूपता निरासक्त नामजप करून ।।
६ जून

शाश्वत नित्य सदा सर्वत्र तोचि एक भगवंत |
त्यास स्वाधीन अखंड नाम नित्य नियम त्यात ||
नित्य कर्मे शास्त्र यासवे रहा सदा नामात |
सातत्ये नामस्मरणे शंका न राहील मनात ||
७ जून

ज्या कामे मना न खंत ते कर्म उत्कृष्ट |
प्रपंची जो विश्वास ती परमार्थी श्रध्दा इष्ट ||
यज्ञ समर्पणे ज्यात तो गृहस्थाश्रम श्रेष्ठ |
भगवंताकडे ठेवता ओढा समाधानी संतुष्ट ||
८ जून

हव्यास वासना विषय याने भरला प्रपंच |
धनी निर्धनी एक अंती असा हा रंगमंच ||
अनुसंधान भक्तीचे ध्येय एक भगवंतच |
ध्यास त्याचा घेता मिळे आत्यंतिक सुख येथेच ||
९ जून

जगणे होणे जाणे गुरु आणि भगवंता हाती |
रामे ठेविले तैसे समाधाने राहणे आपुल्या हाती ||
अभिमान सोडुनि कशातही भक्त समाधानी राहती |
आले विपरीत भोग तरी मन ठेवा भगवंती ||
१० जून

संसारी समाधान नाही पूर्ण म्हणून तो असार |
तरी करितो आपण त्याचा किती बडीवार ||
बऱ्या वाईटाची आसक्ती सुख दुःख देणार |
संत सांगती ती आस सोड परमार्थी आचर ||
११ जून

आपले परके करता या जगी दुःख आहे |
सर्व जग एकतत्त्व पाहता आनंद सुख आहे ||
'मी' पासून 'परमात्मा' अशी मानसपूजा आहे |
विघ्ने येती नामात भगवंत ओळखणे आहे ||
१२ जून

प्रपंच राहे अपूर्णात, परी परमार्थ अनुसंधानात |
आहे त्यात रहा समाधानात, भगवंत आठवे दुःखात ||
विषयी  विकार प्रबळ होत, परी दुर्बळ होत निग्रहात |
शास्त्राधारे श्रध्दा ठेवीत, नाम उपासना करा सतत ||
१३ जून

धर्माने धन वेचावे , मितसंग्रहे सुखी रहावे |
व्यवहारी देणे कधी नसावे, परमार्थी कोणा न दुखवावे ||
सत्कृत्यही शरण भावे करावे, रामकर्ता सदा म्हणावे |
मिळे त्यात समाधान मानावे, भगवंती श्रद्धा निष्ठेस वाढवावे ||
१४ जून

ब्रह्मचैतन्य सांगती रहा नामात |
त्यातची संतसंगती आणि भगवंत ||
सर्वत्र पाहता त्यास निर्भयता मनात |
त्याचा नित्य योग ठेवी अनुसंधानात ||
१५ जून

पूजा अर्चा जप संध्या यात्राही तीर्थाच्या |
शुध्द होते का मन स्नानानेही गंगेच्या ||
विसरता भगवंत जरी उपदेशे संतांच्या |
पूर्ण समजून वा श्रध्देने पायी जावे भगवंताच्या ||
१६ जून

बळे प्रपंच सोडता राहिली आसक्ती |
तेथे पहा व्यर्थ भगवंताची भक्ती ||
विसरू नका स्मरण त्याचे ही युक्ती |
जाता रामा शरण दूर नाही मुक्ती ||
१७ जून

वासनेतून जन्मे काम क्रोध अहंकार |
प्रपंची जे मिळे त्याचा होतो बडिवार ||
परमार्थ साधनी ठेवा गुरूवरती भार |
परमात्मा पालटे परमार्थात संसार ||
१८ जून

देहबुध्दी देई, देहदुःख निरंतर |
धनलोभ देई , सुखालाच अंतर ||
विद्या संपत्तीवान, मानतो श्रेष्ठतर |
देव देतो जरुरीचे धन, कृपा त्याची जयावर ||
१९ जून

माता पित्याचे समाधान, अतिथीला अन्नदान |
व्यवहारातही रात्रंदिन, राखा रामाचे अधिष्ठान ||
'मी कर्ता' हेच चिंतन, तेथ दुःखचिंतेचे जनन |
मुखी रामाचे भजन, तो रक्षी त्याचे करा मनन ||
२० जून

साधण्या परमार्थ ठेवाल भाव |
भेटेल तुम्हाला अश्म काष्ठी ही देव ||
प्रपंचा मध्ये केवळ करावे कर्तव्य |
भगवंताचे होता नाही सुखाचा अभाव ||
२१जून

भोग कितीही अपरिमित, तरी खरे सुख त्यागात |
दीन अभिमानहीन जे होत, तेच ईशचरणी शरणागत ||
निर्लेप भूमिका जरी मिथ्यात, परि सुख आहे सत्यात |
प्रपंच न येतो उपयोगात, शाश्वती केवळ भगवंतात ||
२२जून

भगवंता स्मरूनि करता पश्चात्ताप |
पर्वकाळी नष्ट  होईल सर्व पाप ||
विषय वासना नि प्रपंच हाच ताप |
नामे जाता 'मी'पण प्रकटे परमात्मरूप ||
२३ जून

जे शिकवी नीती धर्म प्रेम तेचि ज्ञान ।
स्वार्थ लोभा नष्टवून ते देते समाधान ।।
जीव जाणता स्वतःला आत्मी होई विलीन ।
ईश्वरप्रेम नाम भक्ती येते करता ग्रंथवाचन ।।
२४ जून

सद् ग्रंथाचे वाचन मनन, तयानुरूप आचरण ।
सद्गुरूंचे आज्ञापालन, साधन भगवंतस्मरण ।।
परमार्थासाठी प्रपंच हा, मानावा त्याचेच कुंपण ।
प्रपंची पावते सुख तेव्हा, करिता जप सदाचरण ।।
२५ जून

जैसा विविध सुमनांत, मध एकसर राही ।
तैसा नाना जीवी ठायी, देव एकचि राही ।।
ज्ञान ध्यान मार्ग कठीण, एक सोपे नाम पाही ।
सगुणा पूजा अन्नदान, करुनि अंतरी राम पाही ।।
२६ जून

लौकिकास्तव केले कर्म, अथवा तसेच पापकर्म ।
त्याने कथाकीर्तनीही नच  मिळे समाधान हे वर्म ।।
देवावरी नसता प्रेम, व्यर्थ नीतिधर्म सत्कर्म ।
संतसंग, वाचन आचरण, नामस्मरण हाच परमधर्म ।।
२७ जून

अभिमान भाव सोडून, करा भगवंताचे भजन |
संसारी स्वार्थ त्यागून, करावे पुत्रादिकांचे पालन ||
श्रध्देने अथवा समजून, अनुसरावे धर्मबंधन |
सत्कर्मी दृढ ठेवावे मन, ग्रंथांसवे आचार समाधाना साधन ||
२८ जून



संतांच्या जन्ममृत्यू दिनी, नामात रहा मनोमनी |
नामात त्याचे रूप पाहुनी, जप करता दिसेल नयनी ||
नाम हेच ईश्वराचे रूप, कथियले श्री समर्थांनी |
उत्सव सण पुण्यतिथीदिनी, नाम जपे राहावे भजनी ||
२९ जून

चातुर्मासी करावा एक नित्यनेम, अंतरी ठेवून  रामाचे प्रेम |
जैसा प्रपंची पतीप्रती सतिधर्म, तैसे सकलकर्मी स्मरावे रामनाम ||
संसारी राखावा अतिथीधर्म, पाहावे सर्व विश्व हे एकचि राम |
हृदयी अखंड राखा रामनाम, रामजपे होई मन पवित्रतम ||
३० जून



संसारी सुखदुःख, परि समाधान  शोधायास |
तळमळ ज्याचे मनी, गुरू भेटेल तयास ||
ज्याचे जवळी जाता, विषय जाती लयास |
सद्गुरू तोच नाम देई, संत मानावे त्यास ||
१ जुलै

गुरूला जाता शरण, करुनी एक मन हीच भेट |
गुरू आज्ञेचे आचरण, नको जपातपाची खटपट ||
गुरू हीच माऊली जाण, नाम हीच खरी वाट |
विसावा मिळे करिता स्मरण, नामजपी गुरुप्रेम आहे अवीट ||
२ जुलै

सद्गुरू जागे करती कर्तव्याप्रती |
महत्वाची जाणा संतांची संगती ||
देहरूपी रथ आपुला सद्गुरू चालविती |
नाम आणि रामरूपी गुरु सन्मार्ग दाविती ||
३ जुलै

देहाची आपुल्या उत्पत्ती , करण्यास देवाची प्राप्ती |
म्हणूनी सोडोनी आसक्ती, करावी देवाची भक्ती ||
परोपकार ब्रह्मचर्य दास्यभक्ती, शिकवितो पहा मारुती |
ठेविले त्यात समाधान वृत्ती, तीच खरी लक्ष्मी संपत्ती ||
४ जुलै

एका जन्मी सर्व अनुभवावे, त्याहून श्रध्देने रामास भजावे |
सद्गुरूवरी भरवसावे, प्रेमे नामसाधन करावे ||
प्रभू रामचंद्रा शरण जावे, त्याचे असीमपण ओळखावे |
प्रारब्धा नामात आनंदे भोगावे, भक्तीच्या शक्तीने त्यास जाणावे ||
५ जुलै

संत संग तीर्थ यात्रा दर्शन, जागविते भगवंताप्रति मन |
जरी व्यवहारी यथोचित वर्तन, ढळू न द्यावे परमेश्वर चिंतन ||
विषय वासनेत मायेचे स्मरण, नामस्मरणी भगवंताचे स्मरण |
तपस्येने त्यास जाता शरण, नामात राहतो तो रमारमण ||
६ जुलै

पाया असता स्थिर, कर्म होई परिपूर्ण |
भगवंता जाणूनचि, करा उपासना आचरण ||
प्रपंचातही ठेवा मन स्थिर, भगवंतची मनी अधिष्ठान |
देहेबुध्दीपार आत्मज्ञान, साधन त्या भगवंतस्मरण ||
७ जुलै

देवाच्या प्रेमबळे होईल अनुसंधान |
सर्वसाक्षी भगवंत त्यासी करा नमन ||
प्रपंची उद्योगात त्याचे करा मनन |
आई मुलासारखे त्याचे राखा संधान ||
८ जुलै

सुखदुःखाची बाधा नाही, जो नामात भगवंता पाही |
दृश्य अदृश्य भगवंतीच पाही, तोचि वास करी आपुल्या देही ||
अनीतीचा मार्ग खरा नाही, परमार्थ सदाचरणी राही |
शरण जावे संतांना लवलाही, ब्रह्मचैतन्य म्हणती 'मी भार वाही' ||
९ जुलै

वृत्तीत विषय स्वार्थ अभिमान, याने न होई अनुसंधान |
सूर्य जैसा सोडवी तमातून, तैसा करी कर्ता रघुनंदन ||
नाम सोडवी विषयातून, नाम वेगळे वाणीहून |
शुध्द वृत्ती आचरण मन, नामप्रेमे भेटेल भगवान ||
१० जुलै

अनुग्रह सत्पुरुषाचा होता, प्रपंची परमार्थी त्याची सत्ता |
उणे अधिक शंका अधिरता, सर्व सोडावे त्या शरण जाता ||
तो सदा एकरूप भगवंता, जाणावे दयाळू त्या संता |
प्रेम भगवंताप्रती राखता, तरीच ओळखाल त्या संता ||
११ जुलै

देवळे बांधली केले पूजन, शास्त्र प्रथा यांचे पालन |
अहंभावे वा पुण्यकर्मे करून, याने केवळ न होई साधन ||
निःशंक प्रामाणिक राहून, करा गुरुवाक्याचे साधन |
व्यवहारातची न गुंतून, दिले नाम घेता सार्थक समाधान ||
१२जुलै

भौतिक सुखाला त्यागूनी, खरे सुख शोधले संतांनी |
परमेश्वरप्राप्तीतच ते जाणुनी, नामी एकाग्र झाले मनी ||
देव नि नाम  एकचि म्हणोनी, रहावे अखंड नामी जीवनी |
नाम घ्यावे निष्ठा ठेवुनी, हेचि कथिले साधुसंतांनी ||
१३जुलै

आसक्ती विहीन संसार, तेच परमार्थाचे सार ।
नाम हाच परमेश्वर, जे देती तुम्हा गुरुवर ।।
अभिमान ठेवूनी दूर, करा संयम भक्तीचा जोर ।
परमार्थ सोपा खरोखर, गुरुवचने भेटेल ईश्वर ।।
१४ जुलै



रक्षी या जन्मी आई अपत्यास, परी गुरू आपल्या जन्मोजन्मास |
गुरूदर्शनाचा घ्यावा ध्सास, कथा कीर्तन लीला वाचनास ||
त्याहून धरिता तुम्ही नामास, गुरु स्वये शोधतील तुम्हास |
अनन्यभावे शरण जा त्यास, तळमळ ती नेईल आनंद धामास ||
१५ जुलै

प्राप्त करणे हा परमार्थ ठेवा, गुरुकृपेचा एकची मार्ग धरावा |
अभिमान सर्वथा सोडावा, परमात्मा कोण तो ओळखावा ||
शिव होऊनी शिव भजावा, तेथे सद्गुण दुर्गुण सर्वथा त्यजावा |
नामात निर्गुण ईश्वर जाणावा, तेथेच मिळे समाधानाचा ठेवा ||
१६ जुलै

आपले कार्य एक निश्चित, परमेश्वर जाणणे आपल्यात |
विसरलो पडल्याने प्रपंचात,  आस ठेविली सुखाची त्यात ||
त्यातून सद्गुरू करीती विरक्त, तेव्हा होई भक्तीस सुरूवात |
कष्टू नका गुरुआज्ञा विरहीत, नामसाधना भेटवी  भगवंत ||
१७ जुलै

नका राहू देहबुध्दीत, विषय आवरती संत |
संत करिती निवांत, तसेच शंकेचाही अंत ||
तळमळ भेटण्या भगवंत, रहा त्याच्या स्मरणात |
समाधान ठेवल्या स्थितीत, आनंदी रहा समाधानात ||
१८ जुलै

अंतर्मुखे आपल्या दोषा शोधावे |
परनिंदा टाळून ते दोष निखंदावे ||
सगुणोपासना करून संतग्रंथ वाचावे |
नम्रता अन्नदान नामजपात राहावे ||
१९ जुलै

नाम हाच ठेवा  आणि वित्त साधकाला |
तयाचे सान्निध्ये स्थान नाही भय शोकाला ||
गुरू आज्ञा जप ध्यान करी या त्रयाला |
खरा गुरूपुत्र ओळखा अशा भक्ताला ||
२० जुलै

कृत त्रेता द्वापारे ध्यान हवन अर्चने ।
ईश्वर भेटतो  कलियुगे मात्र एक नामाने ॥
अनादि अनंत ॐ नाम सांगितले विष्णूने ।
हरिॐ सर्वदा जपा स्वच्छ शुद्ध मनाने ॥
२१जुलै

बुडू पाहता आपण वासना विषयात |
गुरू समजावतो धाके करितो परावृत्त ||
खरे अंतिम शाश्वत सुख गुरूस ज्ञात |
देव देतो साहण्या बळ ठेऊनी समाधानात ||
२२जुलै

सद्गुरूच आपला असे पिता, त्याच्या आधाराची निश्चिंतता |
भगवंतप्राप्तीची आस असता, अनुभव येई श्रद्धेने नाम घेता ||
श्रेष्ठ वैद्य तो चालवी तो जगता, त्यावर दृढ श्रध्दा निष्ठा ठेवता |
नुरो मागण्याची इच्छा तत्त्वता, मागणे नामी ठेवा भगवंता ||
२३ जुलै

विषयासाठी जितके झटता, कष्टावे देव प्राप्तीकरिता |
गुरुच्या ठायीच देव पाहता, त्यांचे साधन करा एकचित्ता ||
सत्संगतीमध्ये सदा राहता, आपले दोष जाती सर्वथा |
संतत्वाचा अनुभव येता, शुध्दता येते आपल्या चित्ता ||
२४जुलै

संकल्प भगवंत प्राप्तीचा, क्षीण करील जोर वासनेचा |
निर्विषय होण्या उपाय नामाचा, मानावे आपणा भगवंताचा ||
जाणीव राखणे ही साचा, हाच अर्थ असे अनुसंधानाचा |
सोडावा लोभ मोह जगाचा, पावन होऊन जाल ही आशिर्वाचा ||
२५ जुलै

अशाश्वताकडे उदास भगवंती मन, भोग वासनांचे दमन |
बाह्य विषयातून खेचून, लावणे भगवंती मन ||
सदा संतोष गुरुवाक्य प्रमाण, आस सद्गुरू भगवंत दर्शन |
सुख दुःख करुनी समान, सदा करावे नामस्मरण ||
२६ जुलै

माता पिता स्वामी यजमान, सगुणरूपे रामाचे अनुसंधान |
जाणा गोंदवले क्षेत्री येऊन, मी पण सोडता होई समाधान ||
सर्व कामात रामाचे अनुष्ठान, त्याचसाठी गोसेवा गोरक्षण |
होऊ नये सज्जने विषयाधीन, निष्ठेने रहावे नामास अनुसरून ||
२७ जुलै

अदृश्याचे मूळ शोधता कशाला, नामात बुडाला तो ओळखेल मला |
प्रपंचाचा दोष ठेवता आसक्तीला, माझी भेट जर जागाल नामाला ||
मिळे ना मिळे त्याचे श्रेय रामाला, समाधान त्यास जो रामाचाच झाला |
देहाच्या भोगाचा मज नाही कंटाळा, रामनामे उध्दरी जो आला जन्माला ||
२८ जुलै

भगवंत नामे नाही ददाद संसारात |
तयांच्या मी प्रपंचात जे माझ्याच स्मरणात ||
मज मातीसमान आहे धन आणि वित्त |
नाम धरा राम तुम्हा ठेवो आनंदात ||
२९ जुलै

झाले गेले विसरून, निरभिमाने करा वृत्ती स्थिर |
परस्त्रीमोह परनिंदा त्यागून, रामावरी टाकावा भार ||
प्रपंचात सुख जैसे पाषाणी जीवन, म्हणूनि जपावा राम रघुवीर |
सदा राखावे रामी मन, राखावा सदा रामाचा विचार ||
३० जुलै

देह प्रपंचाचे साधन, त्याने रामास आळवावे |
निःसंग मने राहून, रहा रामावरी दृढभावे ||
प्रपंची लिप्तता सोडून, ईश्वरा सुखदुःख अर्पावे |
विकार ममता अभिमान, त्यागून सुखेचि रहावे ||
३१ जुलै

प्रपंची त्रासून जरी होई दूर, मनाच्या तळमळीने राहते काहूर |
मनातील इच्छाकांक्षा ठेवावी दूर, कर्तेपण सोडल्यास भेटे ईश्वर ||
भले बुरे जे झाले त्याचा नको विचार, भविष्याची चिंता केवळ हा भार |
नामाचे प्रेम राखा कसेही असो शरीर, नामी देह विसरता कृपा  ही खरोखर ||
१ ऑगस्ट

वांछित वस्तुजाते नाही समाधान |
वासनाक्षये भेटता देव समाधान ||
खरा आनंद मिळे इंद्रिया शांत करून |
परमात्मा ओळखून त्यात व्हावे विलीन ||
२ ऑगस्ट

गुरुवचनी विश्वासून जो होई भक्त |
भगवंतापासून चराचर त्या नाही विभक्त ||
कोठुनी आनंद मिळे धरिता विषयसंगत |
मिळे तोच सदा भगवंत नामस्मरणात ||
३ ऑगस्ट

श्रोता तोच आचरणी आणी वेदान्त |
गुरुचरण शरण तो होई आत्मप्रतीत ||
परीक्षावे कोठे आपली वासना गुंतत |
विचार आणि नामस्मरणे मिळवावा भगवंत ||
४ ऑगस्ट

मी देहचि मानता सुख दुःख अनुभवता |
तो भ्रम जाईल स्वकर्तृत्वअभिमान त्यागता ||
मनी दृढ भाव धरा राम कर्ता करविता |
तोचि भेटे नामस्मरणे नीतिमत्ता आचरता ||
५ ऑगस्ट

अशाश्वत आनंद सुखाच्या आशेत |
उपाधीविना आनंद स्वानंद स्मरणात ||
खरा आनंद जगताला काही देण्यात |
रामाशी अनन्य होत रहा ब्रह्मानन्दात ||
६ ऑगस्ट

भक्तिमार्गाची साधने कर्म, योग आणि ज्ञान |
सृष्टितील माधुरी प्रेम आदि न देती समाधान ||
सगुण वस्तुजाता देता भगवंताचे नाम |
त्याची रूपे जरी अनित्य तरी शाश्वत श्रेष्ठ नाम ||
७ ऑगस्ट

भगवंत नामात राहते तीच खरी भक्ती |
ती सोडवील वासना आणि देह आसक्ती ||
कर्म करता नाम घेता सुखदुःख विरक्ती |
नाम घ्यावे आवडीने तीच स्थिर शक्ती ||
८ ऑगस्ट

धर्माच्या आचरणे होईल चित्त स्थिर |
प्रत्येकाला हवी देव भेटीची हुरहुर ||
भगवंता विना धन आदि व्यर्थ खरोखर |
बुद्धीउपाधीत नसे आनंद तो नामी ईश्वर ||
९ ऑगस्ट

राम भक्ताची काळजी महाराज वाहती |
भगवंतास पाहावे सदा सर्वांभूती ||
रामा सर्वस्वी व्हावे हा आशिर्वाद देती |
नामे मिळे ब्रह्मपद आत्मज्ञानप्रतीती ||
१० ऑगस्ट

भगवंतावीण नाही समाधान, निश्चय बुद्धीचा करा |
स्वतः करून ठाम विचार, बुद्धिभेद पूर्ण विसरा ||
छद्मबुध्दीचा दुराचार, दूर सारील ईश्वरा |
देईल समाधान नाम जागर, भेटवील परमेश्वरा ||
११ ऑगस्ट

जसे नवविधा भक्तीत श्रवण, तैसे शांती पहिले संत लक्षण |
झालेल्याचे दुःख पुढील चिंतेत मन, ते सोडूनी करावे सदाचरण ||
रामी मन दृढ करून, शांती मूर्ती एकनाथ प्रमाण |
निरपेक्षता देई समाधान, कठीण प्रसंगी करा भगवंतस्मरण ||
१२ऑगस्ट

परपीडा दूर करण्या झटावे, याने आपुले हित व्हावे |
ईश्वरेच्छे संकट येता, त्याचे दुःख न मानावे ||
भगवंत नाम स्मरणी राहून, आनंदात आपण राहावे |
दिनचर्या आणि जप करता, भगवंती मना जोडावे ||
१३ ऑगस्ट

शोधु पाहता आनंदनिधान, ते आहे भगवंत चरण |
देह प्रारब्धावर सोडून, करा सदा राम नामस्मरण ||
अशाश्वत भौतिक वस्तूजात, म्हणून त्याचा आनंद काही क्षण |
सर्वदा कर्तव्यास जागून, सदा करावे नामस्मरण ||
१४ ऑगस्ट

पंचमहाभूतमय देहाहून, आत्मा सच्चिदानंद शाश्वत |
भगवंत प्राप्तीस्तव हा जन्म, त्यासाठी रहावे नामात ||
अशाश्वत नाशवंत वस्तू, विषय दुःखात परिणत |
समाधानी वृत्ती नामात, तिला बळ देई वेदांत ||
१५ ऑगस्ट

नव्हे फक्त बुध्दीने ईश्वर प्राप्ती |
वाट त्याची मात्र शरणागती ||
ठेवा धर्म आचरणात रती |
नामात आहे समाधान पूर्ती ||
१६ ऑगस्ट

भरवसा भगवंती ठेवता |
येता जाता प्रपंच करता ||
निष्ठेने त्यास साद घालता |
संसारी नाही काही चिंता ||
१७ ऑगस्ट

होता लाभ अथवा नुकसान, दोन्ही काळी नसावा अभिमान |
सदा करावे रामाला नमन, मानावे स्वस्थितीत समाधान ||
जगताची ज्याने सोडली आस,तो भक्तिने होईल रामाचा दास |
ठेवावी भगवंतप्रेमाची आस, नामी राहता पावाल आशिर्वादास ||
१८ ऑगस्ट

प्रपंच व्यवहारी रहावे दक्ष |
परी असावे भगवंती लक्ष ||
नामी वास सदा त्याची साक्ष |
अंतरिच्या हाकेस पावेल समक्ष ||
१९ ऑगस्ट

भोग आपले भोगणे आपणास, नाही सुटले रामकृष्णादिकास |
पद पुत्र धनादीची आस, स्वार्थचि आहे तयाच्या मुळास ||
विषय आणि प्रपंची सुखास, जो शोधतो नाहीच सुखी खास |
परी नामाची गोडी लागली ज्यास, तोचि पावतो समाधानास ||
२०ऑगस्ट

बाह्य जगातून शोधता सुख, परी ते असे अंतरात |
परीक्षावे बरे वाईट जगी, बुध्दीने शोधावे हित ||
शुध्द कर्माची धरावी कास, वाईट कर्मांना टाळत |
आपुल्याच मनी भगवंत, स्मरून त्यास राहू समाधानात ||
२१ऑगस्ट

ईश्वराची प्राप्ती त्वरित, सांख्य मार्ग जे अनुसरित |
कर्ममार्गाही त्यास भेटवी, कूर्मगतीने परि निश्चित ||
इष्टकर्मांने करा इच्छा पूर्त, उणे शोधता राही दुःखात |
समाधान हे ईश्वरकृपेत, रहावे त्यास्तव त्याच्या  स्मरणात ||
२२ऑगस्ट

संतग्रंथ पोथ्यांचे  वाचन कथन, व्यर्थ होईल तयास न अनुसरून |
मूळ ग्रंथ जणू आईचे स्तनपान, वाचनासवे करावे साधन ||
वेद उपनिषदे गीतेचे ज्ञान, लक्ष देऊन घ्या समजावून |
उणेपण याने येता कळून, हिताचे ते करावे आचरण ||
२३ऑगस्ट

वास करिती जिथे संत सज्जन, तेथ नांदे आनंद समाधान |
कठिण काळीही स्थिर मन, राहती ते संशयास त्यागून ||
अहंभाव कारणाने बंधन, ते सोडून करा अनुसंधान |
संतबोधाचे आचरण, दान, कर्मी ठेवा भगवंत अधिष्ठान ||
२४ ऑगस्ट

सोडता विषय भोगाची आसक्ती, जाण येते ही मिथ्याभिव्यक्ती |
सोडता परिस्थितीबध्द वृत्ती, ती स्थिरावे भगवंताप्रती ||
कार्य काय आपुले काय गती, ते पाहता भगवंत प्राप्ती |
वैयर्थ आहे कोरड्या वेदान्ती, समाधान अंतरी ही नामाची महती ||
२५ ऑगस्ट



असे वस्तुजात जसे नाशिवंत, आनंद त्याचा तसा अशाश्वत |
नका शोधु तो दुःखद प्रपंचात, आनंदस्वरूप एकचि भगवंत ||
कर्ता मी हा अभिमान त्यागता, तन मनाला मिळेल स्वस्थता |
सोडून भूत भविष्याची चिंता, राहून कर्मी स्मरावे भगवंता ||
२६ ऑगस्ट

ईश्वरपदी निष्ठा ठेवून, राखावे अंतरी समाधान |
लाभता कितीही असंतुष्ट मन, तेथ दानाने करावे शमन ||
ओळखा स्वतःस उपाधी टाकून, कर्तव्य करा ठेवून नामसाधन |
शास्त्रपूर्वक सध्दर्माने वागून, अभ्यासे राखावे अनुसंधान ||
२७ ऑगस्ट

जी आड येते भगवंतास, ती शक्ति माया आपणास |
तीच माया देते सुखाचा भास, परी समाधान नसे जीवास ||
म्हणा भगवंत माझा मी तयाचा, मार्ग हाचि मायेतून सुटण्याचा |
प्रपंची न व्हा धनी सुखदुःखाचा, विसर पडू न द्या भगवंताचा ||
२८ ऑगस्ट

माया तोडी भगवंतापासून, द्वैती लोटी ती अद्वैतातून |
मायेला बळ कल्पनेतून, नामसाधने मुक्ती तिजपासून ||
नीती अध्यात्म योग साधून, त्यातून मिळे पूर्ण समाधान |
राहता सदा ईश्वरास स्मरून, मिळे समाधान चिंता सरून ||
२९ ऑगस्ट


दुसऱ्यांचे वर्तन कैसे आपणाशी, असावे वाटते तैसे वागावे तयासी |
अंतरी जहर  बाहेरी साखर जशी, अशांवरी का तू विसंबिशी ||
प्रपंची दक्ष असावे नसावे आळशी, गरजेसाठी राखावी धनराशी |
तरी मन ठेवावे भगवंताशी, नाम साधने तो ठेवील समाधानाशी ||
३० ऑगस्ट

दुखवू नका कोणाचे मन, नामाची ठेवा आठवण |
मज विद्वत्ता श्रीमंतीहून, प्रिय गरीबी अडाणीपण ||
त्यास उपदेशितो माझे मन, ज्याने त्याचे होईल कल्याण |
तया बीज परमार्थाचे पेरीन, त्या योगे तो करील नामस्मरण ||
३१ ऑगस्ट



उलट सुलट होता सुखदुःख भासे, प्रापंचिक सुख  चिरकाल नसे |
हे जाणता भगवंत दिसे, आपल्या अंतरी आनंद असे ||
 इंद्रियगोचर अनुभव भ्रम असे, भगवंतांची माया तेथ दिसे |
किती श्वास राहिले भरवसा नसे, सत्कर्मी अनुसंधानी स्वहित असे ||
१ सप्टेंबर

नामात सदा रहावे, इच्छा वासनेस त्यागावे |
संकल्प विकल्पांना सोडावे, भगवंताचे होऊन रहावे ||
झोपण्यापूर्वी नाम घ्यावे, उठताच ते मुखी असावे |
यास्तव सर्वदा नामात रहावे, तेव्हाच अंतकाळी नाम यावे ||
२ सप्टेंबर



भगवंती भाव जसा स्वामी वा पुत्र |
तया मिळवण्या भक्ती हेच सूत्र ||
लाभहानी सुखदुःख समभाव सर्वत्र |
चिंता विसरुनि स्मरा त्या अहोरात्र ||
३ सप्टेंबर

बाह्य आघाता प्रतिसाद त्यास वृत्ती नाव |
ईश्वर चरणी स्थिरावणे तीस भक्ती नाव ||
भक्त भगवंताचे एकत्व त्यास परमार्थ नाव |
त्यासाठीचे नामस्मरण त्यास तीर्थराज नाव ||
४ सप्टेंबर

वसने वासना विकारांची, सोडता भेट ईश्वराची |
संत मार्ग हा खचितची, देईल प्राप्ति भगवंताची ||
देणगी नामरूपी दिव्याची, जोड सत्संगतीच्या तेलाची |
नको लालसा परस्त्री परधनाची, मार्गक्रमणा सत्य नीतीची ||
५ सप्टेंबर

प्रभाते जागता राम येता मनी, समाधान ते येईल जीवनी |
साधन जे उपदेशिले संतांनी, नामस्मरण करावे सर्वांनी ||
अन्य विचार दूर सारूनी, नामाचा धरावा ध्यास मनी |
मार्ग जो घेतला साधकांनी, तसे करा त्यास अनुसरूनी ||
६ सप्टेंबर

योग्य मार्गे जी मिळे संपत्ती |
वेचावी उदासपणे ती जनांप्रती ||
आपणास हवी गरजेपुरती |
शुध्द सत्कर्मे पत प्रतिष्ठा  देती ||
७ सप्टेंबर

जे जे  दिसे परी नासे, त्याचे नाव माया असे |
निर्गुण ब्रह्म स्पष्ट न दिसे, म्हणून सगुणी पूजन असे ||
वेदांत पठणे समाधान नसे, नामस्मरणात सर्वची असे |
नाम घ्यावे रात्रंदिवसे, देवास प्रिय करणे परमार्थ असे ||
८ सप्टेंबर

साधुसंत सांगती कसे वागावे, विषयवासनादि सोडून द्यावे |
मुक्त होण्या भगवंता शरण जावे, दृढनिश्चयाने नामस्मरण करावे ||
साधन आपुले निष्ठेने करावे, भगवंतासाठी कष्ट करावे |
बुध्दीला नामात स्थिर करावे, निदिध्यासाने साक्षात्कारा पावावे ||
९ सप्टेंबर

रामनामे शिव विषमुक्त झाले, वाल्मिकी अजामीळ हनुमंत उध्दरले |
गोपाळ राम नारायण जपले, वशिष्ठ प्रल्हाद असे किती तरले ||
राम कृष्ण हरी एक ओळखले, सत्य गोरक्षण अतीथीस पूजले |
संतसंगी रामनामी जे दंगले, ब्रह्मचैतन्य म्हणती मोक्षा पावले ||
१० सप्टेंबर



करा सायास सोडून अभिमान, सद्गुरू कृपेने भेटेल भगवान ।
विषय सोडून करावे साधन, तेच पहा भगवंत स्मरण मनन ॥
चिंता सोडून करा कर्तव्यपालन, त्यातचि मिळेल खरे समाधान ।
वृत्ती आपुली अलिप्त ठेवून, गुरुकृपेने करा अनुसंधान ॥
११ सप्टेंबर

आपले परके मानावे समान, भगवंती विश्वासे असे समाधान |
सोडावे कर्तेपण आणि अभिमान, साधुसंतांचे करा अवलंबन ||
तेचि उपदेशिती आपणा साधन, अनुसरुनी त्यास मिळे समाधान |
रामपदी ठेवता शीर्ष आणि मन, सर्व कर्मे होती तयासी अर्पण ||
१२सप्टेंबर

विषय देहबुध्दी आणि अभिमान, तयासह कर्मे करा ईश्वर अर्पण |
नाम घेता येती चित्ती भगवान, नाम घ्यावे परी नच कर्ममार्गा सोडून ||
आपले कर्म घेई ईश्वर करवून, तोच देतो बळ विद्या आणि धन |
ठेवले तैसेचि मानावे समाधान, भगंवतप्राप्तीसाठी करावे ध्यान ||
१३ सप्टेंबर

संत आणि मुक्त जो समत्वी जनी वर्तती, कल्याणकारी कर्मे त्याची भगवंतचि प्रेरतो |
भगवंतास्तव निष्ठा प्रेम दया ठेवतो, त्यासारखे  होण्या पहा कुठे चुकतो ||
अहं अभिमानाने यत्न विफल होतो, संतउपदेशाने मार्ग खरा सापडतो |
संकटे त्यास आठवण्या भगवंत देतो, नाम प्रेमे स्मरणात नाश त्यांचा होतो ||
१४ सप्टेंबर

भगवंत नाम दूर करी दुरिता,  इहभोग संपत्ती त्यास का मागता |
समाधी सुख प्राप्त स्वतःला विसरता, ती मिळे पहा  तेव्हा नाम घेता ||
शिव आणि हरेकृष्ण एकचि देवता, देवत्व लाभेल रामाचे नाम घेता |
ज्ञानचक्षू मिळतील त्याचे नाम घेता, स्वामी असती तिथे जिथे नाम घेता ||
१५ सप्टेंबर

पूर्वजन्मात संस्कार जसे, अथवा येथ वर्तले जसे |
त्याचे प्रारब्ध होतसे, त्यासारखे भोगणे असे ||
सुख अथवा दुःख येतसे, ते आपला देह भोगतसे |
मन ज्याचे भगवंती असे, अनुसंधाने प्रारब्ध नुरतसे ||
१६ सप्टेंबर

प्रपंच सावरण्या आधार, जरी वांछिला परमेश्वर |
तरी गाठण्या पुढला स्तर, लोपवावा स्वार्थ अहंकार ||
भगवंत नाम खरोखर, देह आसक्ती करी दूर |
भक्त शरणागतावर, कृपा करी परमेश्वर ||
१७ सप्टेंबर

आपले ओळखण्या अवगुण, तो राम त्याची देईल जाण |
कृपा करी तो त्यास जाता शरण, गोंदवले हे त्याचे ठिकाण ||
नको व्हावया त्याचे विस्मरण, करावे व्रत उत्सव आणि सण |
भावभक्तीने करावे नामस्मरण, तेथे मागावे रामाकडे गुण ||
१८ सप्टेंबर

जेव्हा जन्मभरी सत्कर्मे करता, अंती आठवाल भगवंता |
तळमळीस कारण अपूर्णता, झालेले होणारे त्याची नको चिंता ||
सत्यस्वरूप याच जन्मी जाणता, भाव इच्छा आच तशी मनी ठेवता |
कळला जो भक्तिमार्ग तो आचरता, वेदांताचे सार भगवंता स्मरता ||
१९ सप्टेंबर

रामाचे होतो जेव्हा आपण, लयास जाईल मी माझेपण |
स्वार्थ प्रपंच दुखाः कारण, त्याने न होते नामस्मरण ||
पुढील चिंता मागील आठवण, विषया त्यागून जावे शरण |
अनुसंधान हाच उपाय जाण, चित्ती भजावा जानकीरमण ||
२०सप्टेंबर

शुध्द मनाच्या स्वच्छ दर्पणात, एकत्वे दुज्याचे कळे मनोगत |
तत्त्वज्ञान सर्वत्र असे एकजात, भोवताल जरी भिन्न होत ||
भगवंती एकनिष्ठा राखत, सोपा सुबोध करतात संत |
राहुनी आपुले कर्तव्यी रत, मनी रहावे भगवंता स्मरत ||
२१ सप्टेंबर

पाहू जाता आपलेच मन, नावरते ते अति बलवान |
शुद्ध आचार चित्त अनुसंधान, यांनी त्यास स्वच्छ करून ||
आहार विहार इंद्रिय निरोधून, अथवा भगवंत भक्ती करून |
सर्वांचे सुख शुभ चिंतून, करावे सर्वदा नामाचे चिंतन ||
२२सप्टेंबर

स्वैर विचार अभिमान, मंदपणे करणे साधन |
याने न साधे परमेश्वर धन, ते मिळे प्रेमे शरण जाऊन ||
उद्धवा प्रति श्रीकृष्ण वचन, मम प्राप्तीचे भक्ती साधन |
तेव्हा मीपणा आळस सोडून, करावे रामनाम अनुसंधान ||
२३ सप्टेंबर

पिता-पुत्र माता-भगिनी, सर्वांनी राहावे समाधानी |
भगवंताचे दास व्हावे निवृत्तांनी, सर्व कर्तव्ये पूर्ण करोनी ||
आज्ञेत रहावे बाल तरुणांनी, आई वडलांचे घ्यावे शिकूनी |
चुकले तरी हितबुद्धीने वर्तूनी, राहावे भगवंताच्या अनुसंधानी ||
२४ सप्टेंबर

बुध्दीदाता कर्ता एकचि जाणावा भगवंत |
प्रेम त्याचे लाभे कराल कर्मे त्यास अर्पित ||
प्रपंचातही देवप्राप्तीचे ध्येय करावे निश्चित |
तयाच्या कृपेस्तव रहावे नाम अनुसंधानात ||
२५ सप्टेंबर

किती झाला वेदान्ती विद्वान, परि उपयोगी व्यवहारज्ञान |
परिपूर्ण हा एकचि भगवंत,  म्हणोनी करावे ते नामसंकीर्तन ||
नामाची खूण घ्यावी समजून, त्यानेच झाला चिरंजीव हनुमान |
सार हेचि पहा सांगते कीर्तन, नामाविणा नच मिळे समाधान ||
२६सप्टेंबर

गुरू करी सर्व आणि तो निभावे, आपले शिष्यत्व पारखावे |
देहातीत होण्या तसेचि ध्यासावे, अथवा भगवंता आपले म्हणावे ||
संकटातही नाम न विसरावे, नीतिधर्म पाळून कर्तेपण सोडावे |
नाम हेचि हवन पूर्णाहुती अभिमान, इह पर दोन्ही देई अनुसंधान ||
२७ सप्टेंबर

संसारी अभिमान सोडता भेटेल परमार्थ |
मी भगवंताचा देह नाही माझा हा खरा अर्थ ||
फलप्राप्ती ईश्वरेच्छा मानूनी करा यत्ने शर्थ |
द्वेषादी सोडून करा अनुसंधान हा भावार्थ ||
२८सप्टेंबर

संत सहवासे मोक्षेच्छा या जन्मी |
परमार्थ सापडे राहता सदा नामी ||
ग्रंथांचे पठण आचरावे नेहमी |
राम करी पालन म्हणू नये कर्ता मी ||
२९सप्टेंबर

संसारी राखा समाधान, परि रामाला स्मरून |
देह परमार्थाचे साधन, राम रंगी ठेवा मन ||
कर्तव्यी निस्वार्थी राहून, यत्न करता भेटे भगवान |
भगवंतस्मरण हेचि साधन, याने मिळे खरे समाधान ||
३० सप्टेंबर



देवांचे उत्सव आणि सण, तीर्थाटने पूजा पठण |
यांचे कार्य भगवंत स्मरण, प्रेमे करावी त्याची आठवण ||
नाम व्हावे जीव की प्राण,  याने भेटे तो क्षणोक्षण |
जिथे नाम तिथे जानकीरमण, जिथे राम तिथे नामाचे ठाण ||
१ऑक्टोबर

आपुल्या अंतरी असे भगवंत, जगी सर्वत्र तोचि ओतप्रोत |
तयाचेच तेजे जग सर्व व्याप्त, तोचि राम त्याचेच कर्तृत्व ||
त्यास सगुण कल्पून उपासित, त्यायोगे बुद्धी होई निश्चित |
एकचि आग्रह मिळावा भगवंत, राम कर्ता माना तो होई कृपावंत ||
२ऑक्टोबर

अहंकाराला सारता दूर, भेटेल तुम्हाला ईश्वर |
रामावर ठेवा भार, तो सांभाळेल पहा संसार ||
नामस्मरणे उत्तम व्यापार, चिंता सोडून करा व्यवहार |
वांछित मिळो न मिळो राहा स्थिर, मिळेल नामाने समाधान ईश्वर ||
३ ऑक्टोबर

गुरु वाक्य हेच प्रमाण मानून, अहंकार जाण्या करावे साधन |
ब्रह्म कोण हे कळे गुरूकडून, ब्रह्म आहे आपल्यातच हे ज्ञान ||
गुरूनेच दिले रामकृष्णा हे ज्ञान, तेचि देती आपणा नाम साधन |
सुखदुःख भोग ईश्वरेच्छा जाणून, तोचि सर्वव्यापी करावे त्याचे मनन ||
४ ऑक्टोबर



देव कृष्ण राम नारायण, तरी असे अवतारांना जन्ममरण ।
साकार भगवंताचे पूजन स्मरण, परमात्मा मिळे उपासता सगुण ।।
नीती धर्मी ठेवा भगवंत अधिष्ठान, यज्ञी करा मीपणा अभिमान अर्पण ।
वश न व्हावे विकारी ते मनुष्यपण, करा लोका साह्य आणि नीती आचरण ।।
५ ऑक्टोबर

सगुण रूपाची तर्जनी दावी, ते निर्गुण सच्चिदानंदरूप ।
परमात्मा तोचि सत्यरूप, शांत सनातन आनंदरूप ।।
भगवंती एकरसी शांति आपोआप, नामे हरती प्रपंच कष्टताप ।
सन्मार्गे टाळूनि मिथ्या पाप, तया भेटण्या अखंड नामजप ।।
६ ऑक्टोबर

नको परद्रव्य परस्त्री मातेसमान, परनिंदा त्याज्य ही नीती सदाचरण।
हेच परमार्थाचे पहा अधिष्ठान, रामनामी राहून जावे त्यास शरण॥
फलाशा सोडून कर्तव्याचे आचरण, कर्म करता ठेवा रामाची आठवण।
वासना त्याग हीच यज्ञाची  खूण, विरक्ती हीच तिच्या आहुतीचे लक्षण॥
७ ऑक्टोबर

जगी कुणी नाही सुखी तरी, जन्मसाफल्य होई भजता हरी।
परमात्मा आत्माचि खरा सूत्रधारी, नाममहिमा लोभा दूर करी॥
सद्वर्तन हेच भविष्याची शिदोरी, गतकाळ विसरोनी रहा खरोखरी।
परमेश्र्वर जोडावा सर्व व्यवहारी, निश्र्चिंततेने भार ठेवा रामावरी॥
८ ऑक्टोबर

स्वतःस विसरुनी भक्त भगवंता स्मरती ।
ऐहिक सुख नव्हे भक्ती हीच प्रगती ।।
जावे सगुण द्वैतमार्गे, स्थान निर्गुण अद्वैती ।
प्राणाहून प्रिय भगवंता प्रीती हीच भक्ती ।।
९ ऑक्टोबर

कशाला हवे वृथा ज्ञान, रामनामे प्रपंची समाधान ।
षड्रिपूंचा संग न ठेवून, गुरुपदिष्ट नाम साधन ।।
हा संसार रामसेवा जाणून, व्यवहारातही रामाशी मन ।
सर्वत्र त्या भगवंतास पाहून, प्रेमे करावे एक नामसाधन ।।
१० ऑक्टोबर

कर्म अटळ परि नव्हे ते बाधक, हेतू वासना हेच जन्मास कारक ।
सत्संगती वासनाक्षय कारक, भगवंताजवळी वास तिचा नाशक ।।
आस आशा ही दुःखास बंधक, कुवासना सोडोनि व्हावे साधक ।
वासना जाता बुध्दी भगवंत एक, सुवासना नीती असे धर्मधारक ।।
११ ऑक्टोबर

भगवंतासी विसरता भौतिक इच्छा उसळे ।
तयाच्या स्मरण चिंतने ती वासना दूर पळे ।।
सगुणखुणे त्या पूजता अंती परब्रह्म मिळे ।
अनुसंधाने तद्रूपता ब्रह्म सत्य जग मिथ्या कळे ।।
१२ ऑक्टोबर

कथा कीर्तन पोथी पुराण, कृतीत त्यांच्या असे कल्याण ।
अविद्या ती विद्या अहिताकारण, सर्वसाक्षी प्रभूची ठेवावी जाण ।।
समाधानात करावे आचरण, देहकष्टातही भगवंत स्मरण ।
सर्व धर्म सोडून भगवंत स्मरण, फलाशा सोडून करा नामस्मरण ।।
१३ ऑक्टोबर

मनी क्रोध विकारा घालता आवर, प्रिय होतील जन आणि ईश्वर |
भगवंती नाते जोडा खरोखर, त्याचे हाती आपले जीवन दोर ||
सात्विकाचाही अभिमान फार, त्याचा त्यागही असे दुष्कर ।
म्हणून मागावे त्यास जोडूनी कर, नामप्रेम हवे नको तव विसर ||
१४ ऑक्टोबर

एकच ध्यास भगवंताचा हव्यास, तेव्हा घडेल प्राप्तीचा अभ्यास |
धनविद्या न लगे अनन्य होण्यास, वर्तावे सदा वाढवी त्याचा ध्यास ||
देहप्रपंच विसरवी भगवंतास, धनकीर्तीचे टाळावेत दोष |
नामी गुंतवावे आपल्या चित्तास, बळ द्यावे सदा अनुसंधानास ||
१५ ऑक्टोबर

परनिंदा आवडता देव दूर जाई, रुची तीमधील सरता तो जवळ येई |
अवगुण असे त्यागुन नामबीज घेई, तया सत्संगाने दोष नुरवून जाई ||
पंडिती केवळ खऱ्या देवा विसरवी, परंतु आचरण त्याचे ईश प्रेम देई |
भगवंत प्रेमे जेव्हा चित्त भरून राही,  प्रेममय जीवनी स्वविस्मरण होई ||
१६ ऑक्टोबर

आनंद भक्तीसाठी भगवंताची संगती, भक्ती करिता होई मायेची निष्कृती |
भगवंताशी अनन्यता हीच पहा भक्ती, याच योगे होई भगवंताची प्राप्ती ||
देह हाच मी म्हणता देहाचे होती, मी देवाचा मानुनी देवरूप होती |
फलाशा घालवी उपासना आणि भक्ती, राम कर्ता मानुनी रहावे या जगती ||
१७ ऑक्टोबर

कर्म हट राजयोगा हून, भक्ती मार्ग सुगम सोपान |
आपुले कर्तृत्व करा ईश्वरा अर्पण,  नपेक्षा करा गुरु आज्ञापालन ||
भक्ती एक निग्रह सर्वस्व सोडून, अथवा तयाचे करा श्रवण मनन |
भगवत भक्ति निष्काम सेवा करून, विषया त्यागून व्हावे भगवंती विलीन ||
१८ ऑक्टोबर

यथाविधी कर्मे करून, करावे भगवंताचे स्मरण |
आप्त प्रियजनांना भोजन,  धर्म संस्कार देती ईश स्मरण ||
अध्यात्म नीतिनियमन, ती देती समाजा समाधान |
निस्वार्थपणे व्यवहार वर्तन, त्यासाठी एक नाम साधन ||
१९ ऑक्टोबर

दैनंदिन व्यवहार प्रपंची ध्यान, परी रामावरी असावे मन |
सद्गुण दुर्गुणा तया अर्पण, मग मृत्युभयाचे काय कारण ||
बाह्य विषयी न गुंतावे मन, एकाग्रतेने करावे नामस्मरण |
विषय आपला नच मानून, करावे अखंड रामाचे चिंतन ||
२० ऑक्टोबर

लाभ हानि आपल्या प्रारब्धे होत, संतही भोगती परी सुख-दुःखातीत |
भोग न भोगणे त्यात नव्हे हित, लोभावरी करावी आपल्या मने मात ||
अभ्यासे पालटे स्वभाव जन्मजात, जशी मशागत पेरण्या शेत |
शुध्द अंतःकरणे भजावा भगवंत,  नाम सदा घेऊन रहावे अनुसंधानात ||
२१ ऑक्टोबर

राम नाम घेता चित्ती भगवंत, वासना जाळता समाधान अंतरात |
समाधान राखा आपल्या प्रपंचात, नीती आचरणी घ्या नाम भगवंत ||
मृदू मधुर भाषा जशी नवनीत, ती येई सदा निस्वार्थ राहण्यात |
विसरू नका संसारी भगवंत, कर्तव्यी जागृती येई राहुनी नामात ||
२२ ऑक्टोबर



निस्वार्थी जनांना काही नसे उणे, त्यांचे ध्येय ईश्वरा प्रेम करणे |
त्यासी लीन होण्या सत्संगतीत राहणे, अथवा पवित्र शुभ विचार करणे ||
त्याहून रहावे सदा नाम स्मरणे, तेथेच राम असा विश्वास धरणे |
नामी राहता वासना दैन्य संपणे, नाम संगतीत सर्वांनी आनंदी राहणे ||
२३ ऑक्टोबर

साधना आणि देहाचा नसावा अभिमान, हितकर होईल ईश्वरी विश्वास ठेवून |
कोणा ना दुखवावे भगवंती मन, हीच खरी पूजा बाह्य उपचारा विहीन ||
आवड तयाची हीच भक्ती जाण, वैराग्य तेचि विषयी अनासक्त मन |
उपासना आरंभण्या सगुणाचे पूजन, रामावरी ठेवावे आपणास अवलंबून ||
२४ ऑक्टोबर

जनी वनी विषय त्यागून फक्त, यानेच नव्हे भगवंत प्राप्त |
तयाविषयी तळमळ सदैव मनात, रामासी जावे शरण त्यासी व्हावे रत ||
रामाचे ब्रीद रक्षणे शरणागत, विनवावे त्यास ठेव समाधानात |
तुज सोडूनि सर्व इच्छांचा अंत, एकचि इच्छा व्हावा राम प्राप्त ||
२५ ऑक्टोबर

प्रार्थना करावी शुध्द बीजासाठी, शुध्द आणि शुभ फळे येती तयापोटी |
आराधना करावी भगवंत कृपेसाठी, अधिक पुण्य करावे परोपकारासाठी ||
साधन प्रगती देई सिध्दी हाती, परंतु वापरावी ती जनकल्याणासाठी |
जीवन राममय होण्या मन भगवंती, तयाचेचि चिंतने मिळे आनंद किती ||
२६ऑक्टोबर

माझे कर्तृत्व ते खरे भगवंत करी, यश अपयशही त्याचे खरोखरी |
चिंता सोडोनी नामस्मरण जो करी, काळजी जाऊनि आनंद त्याचे घरी ||
एवढा  बलदंड अर्जुन धनुर्धारी, श्रीकृष्ण सांगेल तेच तो करी |
आपण बंधक त्या एका यंत्रावरी, भगवंता हाती ज्याची असे दोरी ||
२७ऑक्टोबर

देव गुरूवरी पाहावे कर्तेपण, होईल गुरुवीण कोणते साधन |
त्याचीच सेवा जे होईल हातून, धोंडा पाणी नव्हे मानता क्षेत्र मनोमन ||
भावना ठेवता घरीच क्षेत्रीचे स्नान, नित्य काशी स्मरता पवित्र होई मन |
आसक्ती निघण्यासाठी व्हावे उदासीन, देव आहे हा विश्र्वास हेच खरे ज्ञान ||
२८ ऑक्टोबर

जगाकडे पाहून केला प्रपंच, परी समाधान ईश्वरी दास्यत्वेच |
आचार विचारी राखावे शुच, पवित्र राहाल ढोंग नको मुळीच ||
भगवंताचे होता काळजी नकोच,  ठेविले समाधानी प्रपंच त्याचाच |
अधीन न होता करावा प्रपंच, धर्म नीती पाळा रहा सदा नामीच ||
२९ऑक्टोबर

देहभोगाची चिंता जाई राम संगती, नको विसर त्याचा न दुर्जन संगती |
चित्ती वाचे नाम विश्वास गुरूवरती, साधन विसरता दुःख त्यासाठी भक्ती ||
दुःख सारण्या सोडावी आसक्ती, एकसर नव्हे सर्वकाळ परिस्थिती |
अखंड रामाच्या अनुसंधानी राहती, नामस्मरणे एक देव एक गुरू भजती ||
३०ऑक्टोबर

खरे भाग्य नव्हे केवळ संपत्ती धन, ओळखा सौभाग्य भेटता भगवान |
निस्वार्थ आणि श्रद्धा भगवंती ठेवून, सत्कर्म करावे फलाशा सोडून ||
दिवसाची सुरुवात रामनाम घेऊन, अंतरात आपल्या भगवंत हे जाणून |
सर्वांतरी भगवंत हेच सार जाणून, भक्तीने तयाच्या सफल करावे जनन ||
३१ऑक्टोबर

वेद अपौरुषेय देवांनी निर्मिले, गीतेचे निर्माण श्रीकृष्णे केले |
कर्तुत्वाचे अभिमाने असमाधान झाले, कर्ता परमात्मा जाणता सुखदुःख संपले ||
ज्ञानदेवे तेच भावार्थे प्रकटविले, जणू भगवंतचि त्यांचे मुखे बोलले |
प्रारब्धे देही सुखदुःख भोगले, अलिप्त राहण्या गुरुने नाम दिले ||
१नोव्हेंबर



धर्माचे विधी निषेध अनुसरा मनाने, कर्मबंधन टाळण्यास शास्त्राची बंधने |
लोभवृत्ती त्यागण्यास देवा धन अर्पणे, विपरीत कर्मे ही उपजवीती बंधने ||
भगवंत प्राप्तीस्तव कर्तव्ये पाळणे, समाधान सुख न मिळे अविद्येने |
प्रपंची उदासीन परी भगवंती ध्यासाने, परमार्थाचे हेच सार राखावे अनुसंधाने ||
२नोव्हेंबर


जाणवेल आनंद करिता भगवंत स्मरण, जन्मभरी करणे त्याचे अनुसंधान |
तरीच होईल त्याची अंतकाळी आठवण, त्याच त्या एकाशी राखावे संधान ||
त्याचे नाम करी पापराशीचे दहन, त्याचा सदा आठव हेच खरे पूजन |
मृत्यूचे भयही घालवण्या साधन, नामस्मरण नामस्मरण त्यातचि समाधान ||
३ नोव्हेंबर

निर्गुण भगवंत येता सगुणात, तयाने धारिली नामे अवतारात |
निगम त्यास निर्गुण वर्णितात, सगुण रूप त्याचे संत सांगतात ||
त्याची तळमळ देई संतांची संगत, गुण बाणवावे सत्य एक पत्नीव्रत |
सणवारा सम आनंद देती साधुसंत, विषया सारून सन्मार्ग देतात संत ||
४ नोव्हेंबर

विषयाची आवड अथवा ताबेदारी, आधीन राहता कसा मिळेल हरी |
प्रपंची राजकारणी वा घरीदारी, विसरू नका भगवंत श्रीहरी ||
भौतिक सुख का मागावे दुर्योधनापरी, भरवसा राखावा भगवंतावरी |
तोच कल्पवृक्ष तोच चिंता हरी, त्याची देणगी एक भक्ती खरी ||
५ नोव्हेंबर

कृपा भगवंताची नसता सर्व असे व्यर्थ |
त्याचे स्मरण सदा करता कृपा होई सार्थ ||
असेल त्या परिस्थितीत समाधान हा अर्थ |
त्या कृपेने मुखी नाम जीवन करी कृतार्थ ||
६ नोव्हेंबर

जो राही भगवंती युक्त, त्यासी जाणावे खरा मुक्त |
शरीरी जो आत्मा जो अतीत, राम कर्ता जाणे तो पहावा मुक्त ||
पापास करावे दग्ध राहुनी नामात, साधकाने रहावे सदा सर्वदा जागृत |
साधना आणि वाचना एक प्रमाणग्रंथ,गाथा दासबोध दीपिका वा भागवत ||
७ नोव्हेंबर



मन राहता देही जो अनित्य अंतवंत, त्याने मिळे दुःख, मनी राखा भगवंत |
भयाने चिंता दुःख रहा ईश स्मरणात, तोचि करी सहाय्य राहता नामात ||
भगवंत आहे नामस्वरूपात, भय चिंता नाहीच राहता नामात |
सुख आहे अनीती अधर्म त्यागात, निष्ठा रामाशी ठेवोनि राहावे कर्तव्यात ||
८ नोव्हेंबर

भगवंताकडे  नेई जे कर्म त्याला, त्यासचि ओळखावे ती कला ।
चंचल मने अस्वस्थता देहाला, अभ्यास तोचि जो शिकवी मनाला ॥
हिंसा तीच जी दुखवे दुसऱ्याला, देवा आड येता करता जाणा अहिंसेला ।
सर्वत्र पाहता एकची भगवंताला, नामात राहुनी शुद्ध मने बोला ॥
९ नोव्हेंबर

जगावरी रामाची असे सत्ता, तया अर्पिता सर्व ना काळजी चिंता ।
उपासापरीही उपासना करता, राम सान्निध्य मिळे तशीच निर्भयता ॥
राम कृपाळू त्यास न विसरता, देह दुःख जाई नामस्मरणी राहता ।
दुःखाचे कारण पूर्वस्मरण चिंता, जग सत्य मानता न चित्ती स्थिरता ॥
१० नोव्हेंबर

ज्ञान तेच ज्ञात करी परमेश्वरास, तरी त्याची ओळख खरी भक्ती केल्यास ।
त्यापासून वेगळा न जाणा त्या भक्तास, प्रपंची ही वैराग्य आसक्ती सोडल्यास ॥
गुरुने दिले ते नाम सदा घेतल्यास, सर्व ठिकाणी दिसेल गुरुचाच वास ।
नामस्मरण हेच सत्य ठेवावा विश्वास, गुरु स्मरणे मी पण विरून भेटाल ईश्वरास ॥
११ नोव्हेंबर

संतांचे कोणते आई बाबा कुल गोत,  त्याहून खरे त्यांचे उपासना गुरु ज्ञात ।
मी पण अभिमान ते भगवंता देतात, सर्व इंद्रिय मिळून हा देह औट हात ॥
विषय खोटे समजून राहावे भक्तीत, मीपणास सोडता कशास जावे वनात ।
मी देवाचा मानून राहावे आनंदात, त्याच्या इच्छेने होई सर्व राहावे समाधानात ॥
१२ नोव्हेंबर

ईश्वराने व्यापले अंश रूपे चराचर, त्यास जाणण्याची इच्छा हवी खरोखर ।
संन्यास ब्रह्मचर्य ही देईल ईश्वर, नीतियुक्त गार्हस्थ्यही मानतात श्रेष्ठतर ॥
यज्ञयाग जपतप साधने ही निरंतर, एक मार्ग कोणता ऐका सविस्तर ।
संतांना प्राप्त झाला असे ईश्वर, त्यांच्या च मार्गाने जाणे हेच हित कर ॥
१३ नोव्हेंबर

ऊन वारा पाऊस माती, आकाशासह कशी निर्मिती ।
कर्ता यांचा एक जगत्पती, उत्पत्ती पालन नाश असे त्याचे हाती ॥
देह प्रपंच नसे आपल्या हाती, भजन पूजन देई उत्तम गती ।
विश्वास राखावा रामा वरती, चिंता हरुनी निष्ठा येई चित्ती ||
१४ नोव्हेंबर

सद्गुरू तेच दाखविती आरसा ।
पहा तूच ब्रह्मरूप आहेस कसा ॥
असे असून काळजीत राहसी कसा ।
तोच रक्षी त्यास करा आपलासा ॥
१५ नोव्हेंबर

तीर्थक्षेत्री जाऊनी अवगुण सोडावा, भगवंतकृपेचा घेऊन जावे ठेवा ।
देवाची कृपा तीच अभिमान जावा, तो जाण्या आपला गुरु आठवावा ॥
सात्त्विक अभिमान तोही नसावा, गुरूस जावे शरण तोच आहे विसावा ।
प्रपंची अभिमान जावयास हवा, त्यासाठी दृढ विश्र्वास गुरुवरी ठेवावा ॥
१६ नोव्हेंबर

मिळेल ते भोग आहे ती परिस्थिती, यात दे समाधान भगवंता विनंती ।
विषयांना दूर करुन निरिच्छता इच्छिती, कल्याण यातचि जावे शरणागती ॥
भगवंतापाशी एक निष्ठेची महती, निरभिमाने सात्त्विकापार मार्ग ईश्र्वरप्राप्ती ।
निस्वार्थ प्रेम करावे त्यावर निष्कपटी, नामाचे प्रेम येई धरुनी नाम चिकाटी ॥
१७ नोव्हेंबर

भगवंताने दाविता विश्वरूप दर्शन, भयशंका  विरहित झाला अर्जुन |
माया हीच मी कर्ता अभिमान, भगवंता विसरता ना शंका समाधान ||
सर्व सृष्टीत तोच आनंदघन, त्यास पाहण्या करावे श्रद्धेने साधन |
पूर्ण निष्ठा भगवंतावरी ठेवून, करावे अखंड त्याचे नाम अनुसंधान||
१८ नोव्हेंबर

अनाम अरूप निर्गुण भगवंत, जसे मानावे तशा तो रूपात |
त्याच्याकडे मागावे करा मज भक्त, तसे तो काहीही देण्यास सशक्त ||
भक्ता करिता देव झाले अवतारित, देव आहे त्यास व्हावे शरणागत |
तारिले त्याने बंधू शत्रू शरणागत,  एक नामची आपणा तयासी जोडत ||
१९ नोव्हेंबर

(ज्याच्या आज्ञेविना ना हले पर्ण, तो श्रीराम परमात्मा ब्रह्म निर्गुण |
आत्मा तोचि परमात्मा त्यास नाही मरण, दु:खहर्ता सुखकर्ता त्याचेचि भगवद्‌चिंतन ||
परमात्मा हेचि सत्य सत्य न श्रीरामाविण, उत्पत्ती स्थिती लय ठाव नाही रामाविण |
बुद्धि वासना कल्पना ही सर्व माया जाण, दृश्य सर्व नाशिवंत दुरावते तेचि आत्मदर्शन ||
२० नोव्हेंबर)


आत्म्यास नसे जन्ममरण, त्याहून वेगळा परमात्मा जाण |
ज्याचे आज्ञेविण न हाले पर्ण, तो श्रीराम परमात्मा ब्रह्म निर्गुण ||
भौतिक सुख संपत्ती धन, जरी असावे तरी  लावावे रामी मन |
ही मायाच रोधी आत्मदर्शन, रामचि करी सर्व विश्व नियमन ||
२० नोव्हेंबर

दृष्टीचा जितका विस्तार होई, भेदभाव तेवढा लयास जाई |
भौतिकात सुखदुःख मूळ नाही, धर्माचे आचरण हितकर राही ||
त्यास्तव भगवंत दाता त्राता पाही, कल्पना थांबवून तोचि एक राही |
वस्तू नसताही समाधानचि पाही, जेव्हा वृत्ती भगवंती स्थिर राही ||
२१ नोव्हेंबर

पूर्ण विश्वास देवावरी हवा, त्याचा कनवाळूपणा अनुभवावा ।
तो भलेच करील धरा या भावा, तोच धावेल आपल्या बचावा ।।
संकटकाळी करावा त्याचाच धावा, इतराच्या आशेचा भरवसा नसावा ।
अखंड सहवास त्याचाच धरावा, भगवंताचे नाम घेणे हाच विसावा ।।
२२ नोव्हेंबर

कल्पना बुद्धी ज्ञानाच्या पार, ओळखा आहे तो ईश्वर |
तयाच्या इच्छेने खरे  ज्ञान होणार, नामानेच त्याचे दर्शन खरोखर ||
परमात्मा तोच  सर्व चराचर, तीर्थक्षेत्र देऊळ अथवा घर |
आपणातही देवाचा अंश अवतार, अर्पिता त्यास कर्म तो करी उद्धार ||
२३ नोव्हेंबर

स्पर्श मात्रे परीस पालटी लोहास, भक्ती मात्रे भेटाल तुम्ही भगवंतास |
देहबुद्धी विसरता चैतन्य सगुण मूर्तीस, उत्कट भक्तीने हे येई अनुभवास ||
माते सम भगवंत संभाळी आपणास, तयावरील निष्ठा देईल शांतीस |
उपाधी नाही राम आणि नामास, त्यास्तव रामाशी होई नाम समरस ||
२४ नोव्हेंबर



सोडवण्या जीवनाचे समीकरण, मानावे अज्ञात ईश्वर कारण |
विषय त्यागून जावे त्यास शरण, तया जाणता कोणते जन्ममरण ||
विधी नियम तीर्थ व्रते ही साधन, मिळवण्या भगवंत अव्यक्त निर्गुण |
भगवंताची आस हेच मर्म जाण, त्याचा अंश आत्मा ठेवा नित्य स्मरण ||
२५ नोव्हेंबर

वदन नयन कर्ण एक करून, करावे कीर्तन स्मरण भगवंत दर्शन |
तोच माता पिता पती पुत्र मान, अथवा अरि मित्र वा बंधू जाण ||
अन्नदाता तोचि त्याचे ठेवावे स्मरण, उठता बसता फिरता वा करीता गायन |
तो देईल त्यात मानावे समाधान, सर्व काळी राखावे राम स्मरण ||
२६ नोव्हेंबर

पूजिता शंख चक्र पद्म गदाधारी भगवंत, स्वतःस विसरता या सगुणोपासनेत ।
सगुण ईश्वर तो पाहता स्थलकालात, पूजनी स्व विसरता तोच भेटे निर्गुणात ।।
देव सदा आहे परी न येई ध्यानात, कोणी म्हणे तो शक्ती निसर्गरूपात ।
खरे त्याचे वर्णन केवळ अनुभवात, त्यास कर्ता मानून रहावे कर्तव्यात ।।
२७ नोव्हेंबर

जन्मकारण वासना की जन्मामुळे वासना, भ्रांत याची सोडून करावी नामसाधना ।
जगदाकार छाया ज्याची तोच खरा ईश्वर ना?। शुध्द चित्त ज्याचे त्याला तो दिसे नयना ।।
सद्गुरू वचन करावे सोडून अभिमाना, तेचि देतील नाम पूर्वकर्म निरसना ।
नाम घेता लया जाई विषयवासना, नामप्रेम जो देई तोचि खरा सद्गुरु ना? ।।
२८ नोव्हेंबर

हेतू जन्म आणि कर्माचा इच्छा आणि वासना, तिच्या विलोपासाठी जपा 'रामकर्ता' भावना।
फेरा जन्माचा चुकवण्या नष्ट करा वासना, अनुसरा संतांचा मार्ग जो असे नामसाधना ।
सुखाचा भ्रम सत्ता धन वैभववाना, व्याप आणि वयासह वाढते ती वासना ॥
तिला नष्टवण्या अंगिकारा नामसाधना, तोच मार्ग आणि तीच एक उपासना ॥
२९ नोव्हेंबर

मंगल शुद्ध अचूक ध्यान, हेचि भगवंताचे अनुसंधान।
कृपा करील तो हनुमान, व्यवहारही करा मने राखून॥
वासनादि तुटे जाता रामा शरण, कर्म आपुले तया अर्पून।
एकचि मार्ग तया जावे शरण, त्याने दिले त्यातचि माना समाधान॥
३० नोव्हेंबर

भगवंतमय स्थिती त्या नाव भक्ती, वैराग्य तेचि जे वस्तुवर नसणे आसक्ती ।
धन पुत्र जाया वस्तू यावरील आसक्ती, ती सोडता मिळे वैराग्य आणि भक्ती ।।
विषय नसे बाधक बाधक विषयासक्ती, रामाचे होऊन राहणे ही एक युक्ती ।।
सर्वस्व त्यास अर्पिता येईल अनुभूती, श्रध्देने नाम घेता येते पहा विरक्ती ।।
१ डिसेंबर

मुले लेकरे बंधू अर्धांगिनी जरी, म्हणता आपले एक मर्यादा तरी ।
पहा सर्वदा ईश्वर आपल्या अंतरी, अनन्य भावे त्यास भजावे खरोखरी ।।
सर्व काही होते त्याचे इच्छेवरी, राहावे सदा सर्वदा तल्लीन ईश्वरी ।
कृष्ण सांगे रूप त्याचे असे नामावरी, नाम घ्या सर्वदा राम कृष्ण हरी ।।
२ डिसेंबर



काळाच्या सत्तेने जगदाकार असे, त्याचेच बळे विलय त्याचा असे ।
देहही तसाच परी भगवंत मनी वसे, त्या आत्म्याला आगमन निर्गमन नसे ॥
रामाचे नाम घेता त्यात कल्याण असे, तयाला धरून ठेवा तुम्ही अट्टाहासे ।
श्वास असे तोवरी नाम मुखी येतसे, सर्व ऐश्वर्ये तुच्छ जेव्हा मनी राम वसे ॥
३ डिसेंबर

गोंदवल्याचे धन हे राम नाम प्रेम ।
येथून घेऊन जावे रामाचे नाम ॥
अखंड नामी राहता प्रारब्धातही क्षेम ।
कष्ट प्रपंचातून मिळेल आनंदधाम ॥
४ डिसेंबर

जयाची ठेवता सदा संगत,  प्रेम भगवंती येता तो जाणा संत ।
श्रीरामा आपलेसे करी नामे हनुमंत, नाम घेता श्रद्धेने भेटेल भगवंत ॥
भेटे तो प्राणायाम योग साधनात, परी सहज श्रेष्ठ अजपाजप श्वासात ।
राहता नाम आणि सदाचरणात, समाधान हीच शांती देईल भगवंत ॥
५ डिसेंबर

करिता संसार व्यवहार उत्तम, त्यास माना इदं न मम ।
सर्व गोष्टींचा करविता राम, शरणागती आणि उपाधीविना नाम ॥
द्वेष मत्सर सोडून करावे प्रेम, पाठीराखा भगवंत त्यासाठी नाम ।
आपल्या सुखवैभवाचा धनी असे राम, त्याचे होऊन राहता कल्याण करील राम ॥
६ डिसेंबर



जरी प्रापंचिक पाही सुख विषयात, परी विषय ते दुःखास कारणीभूत ।
भगवंताचे ठायी मन ठेवता स्थित, वृत्ती न होता विषयी ती असावी नामात ॥
नाम आणि प्रेम दोन्हीही निर्गुणात, प्रेम भगवंता येई राहता नाम सहवासात ।
बुद्धी तर्काच्या पार जी वस्तु ती सत, या सत्यास ओळखता स्वतः राहील अलिप्त ॥
७ डिसेंबर

शरीरमाद्यं खलु धर्मसाधन, भगवंत प्राप्तीस देह एक साधन ।
परंतु देहचि मी हे असत्य कथन, अस्थिर प्रपंचात नित्य मरण जनन ॥
पूर्वकर्म हेची खरे दुःखाचे कारण, परिहार होई करिता ईश स्मरण ।
विसराल देहाला करिता नामस्मरण, नाम घ्यावे आणि ऐकावे ते आपण ॥
८ डिसेंबर

गर्व अभिमान झाकती सर्व सद्गुण, सत्कर्मे करावी सोडून अभिमान ।
भगवंतास शोधावे अभिमान सोडून, तेव्हा प्रेमाने जाईल मन भरून ॥
परनिंदेचा उगम आपलेच आहे मन, म्हणून करू नये सामर्थ्य आणि गुणाचा अभिमान ।
प्रपंच नव्हे ईश्वरचे अंतरात सदन, त्याने जाऊन दोष मिळेल शांती समाधान ॥
९ डिसेंबर

सर्व देई श्रीराम दुःख दैन्य घालवून, त्यासि राहता अनन्य मिळेल समाधान ज्ञान ।
देह सोडता अंती श्रीरामास स्मरून, त्यानेच कथिले तो नेईल उद्धरून ॥
त्यासाठी त्यागावा अहं आणि अभिमान, रामास करिता आपुले तोचि करी जतन ।
देह परतंत्र जाणून भगवंती ठेवा मन, अविरत नाम घेता कृपा करी रघुनंदन ॥
१० डिसेंबर

प्रापंचिकाने स्वतःचे सर्व टाकू नये खर्चून, परी 'स्व' अर्पिता ईश्वरास मिळे समाधान।
वैदिकादि कर्मांना त्याचे अधिष्ठान, ते नसता होई कर्मठता उत्पन्न॥
राम नाम घेता देहबुद्धीचे ज्वलन,तोच सिध्द मंत्र तो ॐकार जाण।
कंठी महासिद्धांनी केले रामनाम धारण, त्याच्याच आधारे होईल पहा कल्याण॥
११ डिसेंबर

अन्न दान करिता मिळे त्वरित पुण्य, धनदान करावे परि विचार करून।
भिक्षापात्र नव्हे वैराग्यात दूषण, खरे समजणे खोट्यास जाणा अज्ञान ॥
अंतरंगी परमार्थ किती साधुसंतां ज्ञान, तसेच ते कळे पाहता अंतकाळीचे मन।
परमार्थ मिळे पूर्ण निस्वार्थी होऊन, नाम घेता राही भगवंती अनुसंधान॥
१२ डिसेंबर

चालण्या इन्द्रिये एक हृदय आधार, सर्व भक्ति मार्गात नाम हेच सार ।
भगवंताकडे लावावे प्रपंच प्रीती विकार, तेव्हाच मनी भक्ती होईल साकार॥
पोथ्या पुराणात घालू नये भर, कर्तव्य नि अनुसंधान त्यांचे हेच सार ।
भगवंत चरणी ठेवावा मनाचा व्यवहार, शुद्ध भावाने भरावे आपले हृदयांतर ॥
१३ डिसेंबर

नामाचा सहवास देई भगवंताचा ध्यास, इंद्रिय विषयाची होईल कमी आस ।
शिकावे विकारावरी ताबा ठेवण्यास, आवश्यक ते जरी करण्या व्यवहारास ॥
ईश्वराचे नाम घेता विषय जाती बाजूस, नामस्मरण कारण सत्य समजण्यास ।
स्मरण त्याचे ठेवावे करुनी भजन पूजनास, सार पोथ्यांचे कर्तव्य करा भजा ईश्वरास ॥
१४ डिसेंबर

श्रीकृष्ण अवतार घेता रूप गुण व्यवहार आले ।
परंतु त्या ईश परमात्म्यास येणे जाणे कोठले ॥
अनन्य शरण होता भक्तांना भगवंत पावले ।
सर्व समर्थ नाम या युगी सगुण अवतार झाले ॥

१५ डिसेंबर

परमार्थाचा उगम पूर्वपुण्याईत असे, कर्म दोष सान्निध्याने त्यास बाधा येत असे ।
नाम घेता गुणदोष कर्माचे जातसे, नामात समाधान हाच परमार्थ असे ॥
आपलेपणे संसारी आपणास जसे प्रेम असे, नामाच्या संगाने तसेच ते रामाशी वसे ।
वासनेमुळे संसार सदाच अपुरा असे, भगवंत भेटण्यास 'प्रेम नामाचे' हे गुह्य असे ॥

१६ डिसेंबर



ओळखणे आपले गुणधर्म आपण, पहिले पाऊल परमार्थाचे जाण ।
हवे आपणास अविरत आनंदधन, करी प्रेम देहची समजुनी आपण ॥
विकारास अंगिकारी बुद्धी सोडून, यामुळे परमार्थ न होई एक क्षण ।
सगुण मूर्तीचे करा भजन पूजन, त्या सहवासाने फुलेल रामनाम साधन ॥
१७ डिसेंबर

परमेश्वरचि कारण आपल्या सुखदुःखास, बळही तोच देतो संकटे सोसण्यास ।
'मी कर्ता' वृत्ती सोडता शांतता मिळे मनास, परंतु चिंता काळजी कारण ईश विस्मरणास ॥
मीपणा आणि काळजी ही कारणे चिंतेस, भगवंत स्मरण कारण तिच्या निरसनास ।
काळजी चिंता जाळते आपणास, नाम अनुसंधान 'नाव' त्यातून तरण्यास ॥
१८ डिसेंबर



ऋषी जाणते ज्ञान भगवंती एकरूप होऊन, त्यांचे मुखीचे वेद अपौरुषेय म्हणून ।
आचरण वेदांचे श्रेष्ठ न जाणती विद्वान, निस्वार्थता वेदांचे मर्म विशाल करून मन ॥
मानवी व्यवहार म्हणजे वासना तृप्तीचे यत्न, विरेल वासना पहा भगवंती वास ठेवून ।
जडसूक्ष्माचा दुवा ते एक नाम साधन, परमार्थासाठी तेच सूक्ष्म भगवंताचे साधन ॥
१९ डिसेंबर

केलेले कर्म तो देहास देई फळास, प्रारब्ध भोगणे तरी चित्त द्या भगवंतास ।
प्रारब्ध न चुके संत देवाधिदेवास, तरी रामाचे स्मरण देईल समाधानास ॥
वाचेमुखे राम नाम त्यासाठी विश्वास, वासना त्यागून स्वीकारा रामनामास ।
नाशिवंत देह जरी अमरत्व नामास, भौतिकाची सोडून आस नामाचा घ्या ध्यास ॥
२० डिसेंबर

ब्रह्मही मीच हा मीपणाही त्यागा ।
भगवंत प्रेमासाठी श्रद्धेने नामाला जागा ॥
ईश्वराचे रूप नाम हे जाणून वागा ।
अमृता सारखे नाम भक्तीने घेत जगा ॥

२१ डिसेंबर

नामाला धरून रहा कर्मसंग्राम प्रपंचात, भगवंताचा सहवास नेहमीच नामात ।
उठता बसता वाचता खेळता नित, सर्व क्रियांमध्ये आठवावा भगवंत ॥
वाचेने नाम घेता सत्कर्मे होतात, राम साक्षी मानता दुष्कर्मे दूर जातात ।
भगवंताची शक्ती राहते पहा नामात, त्याचा सदा ध्यास धरता अंती तेच मुखी येत ॥

२२ डिसेंबर

आनंदी वस्तू जात प्राणी यात आनंद दिसे, परी खरा आनंद याहून वेगळा असे ।
परी त्या रूपास अस्तित्व नामामुळे दिसे, अनेक रूपांतरातही एक नाम राहतसे ॥
सातत्य सौंदर्य आनंद जीवनात असे, तसेच अनेकत्वातही एकची नाम वसे ।
उत्पत्ती वृद्धी लय देशकाला पार असे, सत्स्वरूप नाम परमात्म्या समीप असे ॥
२३ डिसेंबर

भोग समायीची दुर्बुद्धी रोखण्या आज्ञापालन, विकार योग्य त्या स्थानी तेच खरे जीवन ।
आरंभी भगवंती प्रेम प्रपंचास्तव म्हणून, तरीही त्याच प्रेमे भगवंती राही मन ॥
परमार्थ वाढता वाढते समाधान, ज्ञान भक्ती मार्ग स्वतःस जाणण्याचे साधन ।
खरा मी आहे आपलेच अंतर्मन, नामस्मरण हेच भक्तीचे मुख्य साधन ॥
२४ डिसेंबर

भगवंतास दोन्ही समान विद्वत्ता सामान्य ज्ञान ।
चिकित्सकांना न मिळे अंतापर्यंत नाम समाधान ॥
जाणता अजाणता चूक होता पश्चाताप पावून ।
क्षमा करेल भगवंत घेता नाम शरण जाऊन ॥
२५ डिसेंबर

कृत त्रेता द्वापार युगी शमदम यज्ञ पूजन ।
परी कलियुगासाठी नामस्मरण हेचि साधन ॥
भगवंत घेती अवतार दुष्टांचा हरण्या अभिमान ।
राग षड्रिपूंना आवरण्या पाळा नीतीचे बंधन ॥
२६ डिसेंबर

सत्पुरुषाकडे जाती प्रपंचतापी जे नडले, परंतु हव्यासा पुढे समाधान कोठले ।
मनी हेतू ठेवून भगवंताला पूजले, दानधर्मही सर्व मी पणाने केले ॥
तया पामराला भगवंत दर्शन कोठले, म्हणून केवळ भगवंतासाठी जे झिजले ।
समाधान त्यांना केवळ भक्तीने मिळाले, राम आपल्या अंतरी हे त्यांनी जाणले ॥
२७ डिसेंबर

वेद ग्रंथ ज्ञानाचा जरी मजपाशी अभाव, दीन दास मी रामाचा राम नामावरी भाव ।
संयम षड्रिपुदमन सत्य विजनवास स्वभाव, गायत्री उपासनेत ऋषींचा त्या प्रभाव ॥
सद्यकाळी परी निष्ठा श्रद्धेचा अभाव, वैदिक कर्मासवेच नामावर ठेवा भाव ।
आदि नारायणाचा वेदारंभ ॐकार रव, तेच भगवंताचे नाम तेथेच वेदांचा ठाव ॥
२८ डिसेंबर

कामना विषयासाठी ईश्वराची प्रार्थना, ती नव्हे भक्ती ती न सोडी बंधना।
विरागी नव्हे तो जो पडे मठादी बंधना, अहंता त्यागून ठेवा रामकर्ता भावना॥
एक भगवंत राम कर्ता मानणे उपासना, संत संग मिळे करता अनुसंधाना।
संत जाणण्यासाठी करा नाम साधना, नाम सिद्ध करून देणे संतांचा उपकार ना ?॥
२९ डिसेंबर


उजाडता करावे मानसपूजन नैवेद्य अर्पण, रामास विनवावे कृपेसाठी जावे शरण।
समाधान कृपेसाठी द्यावे नामाचे स्मरण, त्यासाठीच व्हावा मजकडून देह अर्पण॥
नको नुसते ब्रह्मज्ञान अथवा शास्त्राचे ज्ञान, नको मज काम क्रोध आणीक कर्तेपण।
समाधानी वृत्तीसाठी तनमन रामा अर्पण, निष्ठेने त्यास स्तवता तोच करी रक्षण॥
३० डिसेंबर


तेरा कोटी जपसंख्या तेरा अक्षरे मंत्राची, तरी नामे चिरंतन चिरकाल स्वरूपाची ।
देव भक्त नाम ही त्रिवेणी संगमाची, न कधी ताटातूट देव नाम भक्ताची ॥
रामा जवळी मागा कृपा समाधानाची, देह जरी अर्पिला तरी भक्ती देवाची ।
देव भेटण्याची वाट नाम श्रद्धा भक्तीची, प्रार्थना अंतीम श्वासातही राम नामाची ॥
३१ डिसेंबर

जिवा शिवा जोडी नाम ।
सगुण निर्गुणात नाम ॥
चित्त शांत करी नाम ।
अंती येवो मुखी नाम ॥
१ जानेवारी

**श्री. शशिकांत कोंडेजकर लिखित व ई साहित्य प्रतिष्ठान प्रकाशित चार पुस्तके.**

**यांच्या कव्हरवर क्लिक करताच उघडतील.**




हनुमानचालीशी
मराठी अनुवाद- शशिकांत कोंडेजकर
महावीर विक्रम बजरंगी । कुमति निवार सुमति के संगी ।।
कंचन बरन बिराज सुबेसा । कानन कुंडल कुंचित केसा ।।

# देवी


## अथर्वशीर्ष

## सप्तश्लोकी



संस्कृत+मराठी श्लोकानुवाद

शशिकांत
कोंडेजकर


श्रीमद्भगवद्गीता
मराठी श्लोकानुवाद
भगवान कोंडेजकर